म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. ३६६४





IRBK-0103664
IRBK-0103664

ह. भा. वाघोलीकर



# त ड जो ड

[ एका इंग्रजी कथेचा स्वैर अनुवाद ]

लेखक

ह. भा. वाघोलीकर,

एम्. ए.

२६७९८
वाचनालय
१-३-६१

किंमत बारा आणे

वा. क्र. ३६६४ नों. दि
वि. ...... क्र.

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

आवृत्ति पहिली
सप्टेंबर १९५१

# दोन शब्द

मला आवडलेल्या एका इंग्रजी कथेचा स्वैर अनुवाद म्हणजे छोट्या हंसाची ही कथा होय. गिरणीमालक, मजूर, संप व लढा या सध्यांच्या काळांत हरघडीं ऐकूं येणाऱ्या शब्दापाठीमागील जीवनांत चाललेला जो प्रचंड कलह आज दिसून येत असतो, त्यामध्येंहि कांहीं लपलेले प्रेमाचे पाझर कधीं कधीं आढळून येतात आणि त्यामुळेंच हें जीवन सुसह्य होतें. जीवनकलहांतील असाच एक लपलेला प्रेमळ पाझर या कथेच्या रूपानें मी पुढें मांडीत आहे. ही कथा प्रथम ‘ शालापत्रक ’ या मुलांच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाली. आतां येथें ती पुस्तकरूपानें प्रकट होत आहे.

आजपर्यंतच्या माझ्या अनेक छोट्यामोठ्या पुस्तकां-प्रमाणें माझ्या बालवाचकांस ही गोष्ट आवडेल अशी खात्री वाटते.

गणेशचतुर्थी }
५–९–५१ }

लेखक

## याच लेखकाचें
## इतर बालवाङ्मय

राजा ससा व त्याच्या गोष्टी

पोपटपंची

गुलाब आणि अंगठी

नीलचंद्र निनाद

मोहन

दादू व तातू

गुप्त खजिना

गोकुळ

महाराष्ट्र शारदेचे मानकरी ( भाग १ ला )

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय
IRBK-0103664
IRBK-0103664

# त ड जो ड

: १ : गाडींत

'का हो, ही गाडी आमच्या काकांच्या घरीं जाते का?'

हा धिटाईचा प्रश्न ऐकून तोंडावर एकसारखा वर्तमानपत्राचा बुरखा घेऊन बसलेल्या किकाभाईंनें आपल्या तोंडापुढचें वर्तमानपत्र जरा बाजूला केल्यासारखें केलें आणि प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीकडे पाहिलें.

दोन लुकलुकते डोळे त्या पारशाच्या बसक्य नाकावर स्थिरावले होते. ती चमकती नजर,

खिडकींतून येणाऱ्या वाऱ्यानें भुरभुरणाऱ्या कपाळा-वरच्या दोन गोड बटा आणि .... आणि काय ? सारेंच कांहीं सुंदर होतें....आणि त्या सौंदर्याकडे स्तिमित दृष्टीनें कितीतरी वेळ तो पारशी पहात होता.

'अहो, पहातां काय नुसतें माझ्याकडे ?' आपले फुगीर गाल जास्तच फुगवीत त्या प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीनें त्या पारशाला चांगलेंच खडसावलें.

'अरे हो, चुकलेंच आमचें !' आपल्या बसक्या नाकाचा शेंडा रुमालानें जरा गोंजारीत तो पारशी म्हणाला, 'काय म्हणालीस बाळ तूं ? नांव काय तुझा ?'

'शाबास–अहो, तुझा काय म्हणताय् ? मी काय मुलगा आहे कीं काय ?....आणि माझ्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या अगोदर तुम्हीच मला उलट प्रश्न विचारतां कीं .... ? चांगलेंच दिसतां.'

ही सरबत्ती ऐकून तो पारशी हंसूं लागला आणि

त्याच्या त्या हंसण्याला त्या डब्यांतल्या इतरांह पांच सहा उतारूंनीं साथ केली.

‘ हंसायला हा काय झालें ? ’

‘ कांहीं नाहीं बाळ.... ’ त्या पारशाच्या समोरच्या बांकावर गाडीच्या गतीबरोबर आपल्या तुंदिल तनूला हेलकावे देत बसलेले एक पोक्त मिशाळ गृहस्थ आपलें मिशांचें कुंपण बाजूला करीत तपकिरीची भली मोठी चिमूट नाकपुड्यांत कोंबण्याचा प्रयत्न करीत म्हणाले, ‘ अहो आजोबा, माझें नांव कांहीं बाळ नाहीं. माझें नांव हंसा आहे. ’ त्या मुलीनें फणकाऱ्यानें उत्तर दिलं.

तिला नकळत तिनें आपल्या प्रश्नाचें उत्तर देऊन टाकलेलें पाहून तो पारशी आणि त्याच्याबरोबर ते पोक्त गृहस्थहि मोठ्यानें हसूं लागले. हसण्याच्या भरांत दोघांनाहि शरीराचा तोल सांवरला नाहीं. म्हातारबुवांची तपकिरीची चिमूट त्या पारशाच्या बिटक्या नाकाच्या नाकपुड्यांपाशीं जाऊन थबकली आणि पारशाच्या हातांतला गांठीचा तुकडा म्हातारबुवांच्या मिशांच्या जाळींत अडकला.

ही विलक्षण गंमत पाहून हंसाला हसूं आवरेना. पण आपल्या गोड गालांत तें अवखळ हसूं तसें आलेंचळें दडवून ती बोलायचा प्रयत्न करीत होती.

हंसा एक आठ नऊ वर्षांची गोड मुलगी होती. सौंदर्याच्या तेजानें तिची गरिबी झाकली जाण्या-सारखी होती. पांढरा शुभ्र झगा, मानेभोंवतीं रुळणारे केसांचे दोन शेपटे आणि त्यावरचीं कुंदाचीं फुलें तिला मोठीं शोभून दिसत होतीं. तिच्या नजरेंतली धिटाई तर अवर्णनीय होती. तिनें जेव्हां पहिलाच प्रश्न—

'ही गाडी आमच्या काकांच्या घरीं जाते का हो ?'

—जेव्हां विचारला तेव्हांच किकाभाईच्या चौकस नजरेला तिच्याबरोबर दुसरें कोणी मोठें माणूस नसल्याचें आढळून आलें होतें. आणि आतां जेव्हां म्हातारबुवांची तपकीर नाकांत गेल्यानें त्याला जी खडसून शिंक आली तिनें तर तो चांगलाच भानावर आला आणि त्याला तासा दीड तासापूर्वींचा प्रसंग स्पष्टपणें आठवला........

गाडी कमलपूर नांवाच्या एका बऱ्यापैकीं स्टेशनावर उभी होती. किकाभाइ डब्याच्या खिडकींतून स्टेशनाच्या प्लॅटफॉर्मवरची लोकांची धांवपळ पहाण्यांत गुंगला होता. ताच एका आठ नऊ वर्षांच्या मुलीला हाताशीं धरून एक म्हातारी बाई त्या डब्यापाशीं आली. त्या म्हातारीनें त्या मुलीच्या पाठीवरून हात फिरविला आणि तिला गाडींत बसावयास सांगितलें.

'जा बाळ....तुझ्या काकाशिवाय तुला आतां कोण आहे? .... नीट सांभाळून जा.' ह्या म्हातारीच्या शब्दांनीं त्या मुलीला हुंदकाच आला. समोर बसलेल्या त्या पोक्त गृहस्थाला त्या मुलीवर लक्ष देण्यास सांगून त्या म्हातारीनें तिचा निरोप घेतला. तो प्रसंग तेवढ्यावरच सोडून किकाभाईनें आपल्या तोंडापुढें जें वर्तमानपत्र धरलें होतें, तें—

'का हो, ही गाडी आमच्या काकांच्या घरीं जाते का?' हा हंसाचा प्रश्न त्याच्या कानांवर आदळेपर्यंत तसेंच होतें.

आणि ह्याच प्रश्नाची पुन्हां एकदां हंसानें जेव्हां

आवृत्ति केली, तेव्हां किकाभाईला तिच्या प्रश्नाचें उत्तर देण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

‘ हंसा नाहीं का तुझें नांव ? ’ किकाभाई म्हणाल्या.

‘ हो ! पुन्हां पुन्हां काय तेंच तें विचारतां ? ’ हंसानें उत्तर दिलें.

‘ बरें बुवा राहिलें ! ही गाडी तुझ्या काकाच्या घरीं कांहीं जायची नाहीं. पण त्याच्या गांवांत मात्र जाईल. ’

‘ मग मी काय घरीं म्हणजे काय घरांत म्हटलें होतें काय ? घरीं म्हणजे गांवांतच ! ’

हा तिचा विलक्षण युक्तिवाद ऐकून किकाभाई थक्कच झाला. पुन्हां त्यानेंच तिला विचारलें.

‘ तुझे काका कुठें रहातात ? ’

‘ काय ? माझे काका कुठें राहतात तें माहीत नाहीं तुम्हांला ? अय्या ! मग कसले तुम्ही मोठे ? ’ दांतांच्या कुंदकळ्या बोटांनीं झाकून हंसा म्हणाली.

‘ तुम्हांला कधीं आम्ही म्हणालों मोठे आहोंत म्हणून ! ’

'अहो, म्हणायला कशाला पाहिजे ! आहांतच कीं मोठे आणि एवढे मोठे असून रामनगरचे आमचे काका....जयरामदास शेठजी माहीत नाहींत ? '

'कोण ! रामनगरचे जयरामदास शेठजी ? राम मिलचे मालक ? ' कोटाचा वरचा खिसा चांचपल्यासारखी उगीचच चाळवाचाळव करीत किकाभाई आश्चर्यानें म्हणाला.

'अय्या ! म्हणजे तुम्हाला माहीत आहेत वाटतें आमचे काका ! '

'हो ..., राम मिलचे मालक कुणाला माहीत नाहींत ? '

' आहेत ना माहीत ? मग उगीचच मला हसलात....मग रामनगरला जाते ना ही गाडी ? ' पुन्हां हंसानें विचारलें.

'हो तर ! मला सुद्धां रामनगरलाच जायचें आहे.' असें म्हणून किकाभाईनें पुन्हां आपलें डोकें वर्तमानपत्राच्या घडींत खुपसलें.

'कुठें ? आमच्या काकांच्या घरीं ?' ह्या हंसाच्या प्रश्नाला त्यानें उत्तरहि दिलें नाहीं.

तो आतां आपल्याशीं बोलत नाहीं असें पाहून हंसानें आपली नजर खिडकींतून बाहेर वळविली.

धांवत्या गाडीखालून जमीन सरासरा सरकत होती. हिरवळीच्या मखमालीवरून गाडी काळी शिवण टाकीत चालली होती. झपाट्यानें मागून येऊन पुढें जाणारे तारेचे खांब मोजण्यांत हंसा गर्क झाली होती.

———

## : २ : संपाची वावटळ

रामनगर स्टेशनचें आवार आज नुसतें माणसांनीं फुललें होतें. रामनगर हें जरी मोठ्या लोकवस्तीच्या नगरांत मोडणारें एक नगर असलें तरी आजच्या-इतकी गर्दी त्या स्टेशनानें कधींच अनुभवली नव्हती. एखाद्या मोठ्या माणसाच्या स्वागतार्थ तो जनसमूह तिथें जमला असावा असें पहाणाऱ्या कोणाहि माणसाला वाटलें असतें.

—आणि होतेंहि तसेंच कारण.

त्या जमावांतलीं तीं माणसें म्हणजे समाजाच्या

विषमतेचें एक मनोवेधक प्रदर्शन होतें. एकाच्या म्हणून अंगावर धड कपडा नव्हता. हातापायांच्या काटक्यांवर लगडलेल्या त्या चिंध्यांच्या सूतपुतळ्या बघून भांडवलशाही देवतेला ओवाळण्याच्या ह्या दिवट्या आहेत कीं काय असा भास उत्पन्न होई. त्यांचे ते पिंजारलेले केस आणि वाढलेल्या दाढ्या—वाढत्या दारिद्र्याच्या निशाण्याच होत्या त्या. त्यांच्या खोल गेलेल्या नजरा नुसत्या वखवखलेल्या होत्या. तितक्या त्या खोलींतूनहि बाहेर पडून त्या नजरा कुणाला तरी हेरण्याची धडपड करीत होत्या. आणि नजरेच्या फेकीबरोबर हातांच्या मुठीहि वळल्या जात होत्या.

'राम मिलचा संप दिसतो आहे आज—' त्या जमावाकडे दुरून पहात एक प्रतिष्ठित गृहस्थ म्हणाले आणि अलगद 'येथें थुंकूं नका' ह्या पाटीवर त्यांनीं एक पल्लेदार पिचकारी सोडली.

त्यांच्या त्या पिचकारीच्या अगोदरच्या शब्दांनीं चौकस बुद्धि जागृत झालेले दुसरे एक पायजम्यांतले

क्रमांक २९.८ विभाग वा क्रमांक १५ १

फाटक्या अंगाचे जवान खोकत म्हणाले—

‘अहो, चार पांच दिवस हा संप चालू आहे म्हणतात.’

‘म्हणजे! हो का?’ तंबाखूनें भरलेल्या तोंडांतून शब्दांचे एक दोन फुगे सोडण्याचा प्रयत्न करीत त्या पहिल्या गृहस्थानें तें संभाषण तेवढ्या-वरच तोडलें. तेव्हां नाइलाजानें त्या लुकड्या जवा-नाला पायजमा झटकून पुढें सटकावें लागलें.

जसजसा वेळ जात होता तसतशी त्या गिरणी कामगाराच्या जमावाची चंचलता वाढत होती. त्या जमावांत कांहीं बायकाहि होत्या. त्यांच्या निस्तेज आणि कळाहीन मुद्रेवरून त्या अगदीं कंटाळलेल्या दिसत होत्या. दोन तीन प्रकारच्या लुगड्यांचे तुकडे एकत्र जोडून तयार केलेलीं पटकुरंच बहुतेक बायका नेसल्या होत्या. तेंहि पटकुर कांठाजवळ फाटल्यानें त्यांतून डोक्यावरचे विखुरलेले केस पुंजक्या पुंज-क्यांनीं डोकावत होते. त्यांच्या त्या कळकट शरीराला चार पांच दिवस पाणी लागलें नसावें असें वाटत होतें. एक दोघी त्या तिथल्या स्टेशनावरच्या नळावर

अधूनमधून जात आणि हातपाय धुवून येत. कांहींच्या बरोबर लहान मुलेंहि होतीं. त्या भिंतीच्या आडोशाला जात आणि आपल्या लहानग्याला पदराखालीं घेत. पण तो चिमुकला जीव लगेच पदराआडचें तोंड बाहेर काढी आणि आईकडे अशा कांहीं नजरेनें पाही कीं, तिला वाटे तो जणूं कांहीं आपणांस म्हणत आहे–

‘ अशी फसवणूक केलीस का माझी ? ’

—आणि अशा त्या अर्भकांनाहि मग दुधाची तहान पाण्यावर भागवावी लागे.

आठ नऊ वर्षांचीं कळतींसवरतीं पोरें होतीं. तीं एका जागीं स्वस्थ बसत नसत. आरंभाला त्यांनीं बरीच इकडे तिकडे जा ये केली. पण आतां त्यांचींहि शरीरें दमलीं होतीं. विटलीं होतीं. कंटाळा आला होता त्यांना तिथल्या गार फरशीवर बसून. केव्हां एकदां इथून घरीं जायला मिळेल असें झालें होतें त्यांना. त्या बालजीवांची एकसारखी चुळबुळ चालली होती. त्यांतच एक सांवळ्या वर्णावर असलेली नाटस मुलगी होती. आपल्या आईशेजारीं

मुकाट बसून रहाण्याचा तीं आळेंबळें यत्न करीत होती. पण तिला तें जमत नव्हतें. हरणाप्रमाणें धांवणारी तिची नजर एका ठायीं रहायला तयारच नव्हती. तिची ती लबाड नजर दूरच्या कुठल्या तरी एका नजरला भिडली. नजरेचें गुपित गालावर उतरलें. आणि आई आपल्या लहान भावाला पाजण्यांत गुंतली आहे असें पाहून ती मुलगी झटकन् उठली. पण—

'पोरे, बस मुकाट, कुठें जायचें नाहीं उनग्या-वानी!' असें म्हणून तिच्या आईनें खसकन् दंड धरून तिला खालीं बसवलें.

पारूच्या गालावर ओघळलेलें गुपित पार नजरेवाटें पुन्हां पळून गेलें. बिटक्या नाकाभोंवतीं गालांचे उंचवटे चढले. एक आडवा हात नाकापुढून सरकन् सरकला. आणि ओठांचा द्रोण करीत पारू आपल्या आईला म्हणाली,

'आमाला कुटं जाऊंवी, याचं न्हाई....अन् इतं बसून काय करायचं....कटाळा आला मला.'

‘ अन् आमाला उत्साव आलाय् ’ पारूची आई रागानें म्हणाली. तिच्या त्या शब्दांत रागाचें माप पुरेपूर होतें. पण तो राग पारूवरचा होता का तिथें बसायला लावणाऱ्या त्या संपाचा होता हें सांगणें कठीण होतें.

‘ आई, पन् इथं कशापायी बसून रहायचंय् ! ’ पारूनें विचारलें.

‘ अग, मला तरी मेलीला कुठं ठावं हाय ? ’ पारूची आई म्हणाली, ‘ आपले गिरणभाऊ म्हणतील तसें करायचें. संप झाला चार दिवस.... आजचा पांचवा दिवस. रिकाम्या पोटानें मिरवणुका काढल्या, घोषणा केल्या....अन् आज हें स्टेशनांत धरणें धरून बसायची वेळ आली. ’

‘ जळ्ला मेला संप.....पोटांत कांटे भरायची वेळ आली. त्या शिकलेल्या वाळक्या पोरी उगाच येऊन आमच्या गिरणभाऊंच्यीं माथीं भडकवितात ’ जवळच बसलेली एक म्हातारी म्हणाली.

‘ अहो पन् आजीबाई, आपल्याच फायद्यासाठीं सांगतातना त्या.... ’ त्यांतल्या त्यांत व्यवस्थित रहाणीनें

त्या बायकांत उठून दिसणारी एक बाइ म्हणाली.

‘ हय माहीत ! ’ तिच्या त्या लाल केलेल्या ओठांकडे तिरस्कारानें पहात ती म्हातारी म्हणाली आणि तिनें आपला पदर खसकन् पुढें ओढला.

त्यांचें तें संभाषण इथेंच विराम पावलें. आतां-पर्यंत बसून राहिलेला तो कामगारांचा जमाव आतां उतावीळपणें उभा राहिला होता. त्याबरोबर बायकाहि उभ्या राहिल्या. सगळ्यांच्या नजरा प्लॅट-फॉर्मवर खेळत होत्या. शब्दांचे अंदाज बांधण्यांत कुजबुजीचें गोंगाटांत रूपांतर होऊं लागलें.

‘ वेळ झाली वाटतें गाडीची ! ’ कुणीतरी कुणाला तरी विचारलें.

‘ हं ! नेहमीं साडेचारला गाडी येते. चार झालेच कीं आतां ’ ज्याला विचारलें त्यानें उत्तर दिलें.

‘ येईल का हो तो ह्या गाडीनें ? ’

‘ तर....आपल्या दाजीबानें अगदीं आंतून माहिती मिळवलीय्. आज चार दिवस गिरणी बंद.... मालकाचा जीव अगदीं उडून गेलाय्....तात्पुरत

जास्त रोजमुऱ्यांवर भाडोत्री कामगार लावून गिरणी चालू करायची....'

'आणि आपल्या पोटावर पाय आणायचा....'

'हा मालक वर्गाचा नेहमीचा डाव आहे.... आणि अशांना ह्या संपफोड्या मदत करणार'

'तेवढ्याचसाठीं बेटा येणार आहे वाटतं?'

'नाहीं तर काय....बदमाष लेकाचा....'

'गाडींत दिसला कीं खेचला पाहिजे बाहेर आणि बेदम चोपला पाहिजे....'

'नांव काय म्हणालास त्याचें?'

'अहो, तो मुंबईचा किकाभाई—काकड्याखाऊ.'

ठण् ठण् ठण् ह्या टोल्यांनीं ती कुजबुज मात्र थांबली!

## : ३ : किकाभाई निसटला !

किकाभाईनें तोंडापुढं वर्तमानपत्र धरलेलें पाहून हंसानें आपली नजर तारेचे धांवते खांब मोजण्याकडे जी वळविली ती बराच वेळ माघारीं घेतली नाहीं.

आणि जरा वेळानें ती खांबहि मोजण्याचें विसरून गेली. माघारीं जाणाऱ्या त्या खांबांबरोबर तिचें विचारचक्र जें वेगानें मागें भिरभिरत गेलें तें त्यानें कमलपूर गांठलें. कमलपूर स्टेशनाचें आवार सोडलें कीं फर्लांगाच्या अंतरावरच तिचें घर होतें. दोन छोटेखानी खोल्यांतच तिच्या आईनें आपला छोटासा

संसार टापटिपीनें मांडलेला होता. हंसाला कळत नव्हतें तेव्हांच तिचे वडील वारले होते. घरांत एक शिवण्याचें मशिन ठेवून हंसाची आई त्यावर आपला संसार नेकीनें चालवीत होती. तिला हंसा जीव कीं प्राण होती. तिच्या प्रेमळ स्वभावामुळें आळींतल्या साऱ्या बायका तिला शिवण्याचें काम देत. कधीं कधीं रात्रींच्या बारा वाजेपर्यंतहि हंसाची आई शिवत बसलेली असायची. तिच्या मांडीवर झोपीं गेलेली हंसा पुन्हां मध्येंच जाग आल्यानंतर मध्येंच डोळे किलकिले करून पाही तेव्हां आपल्या आईचें शिवण चालू असल्याचें तिला दिसे. मग तीच हट्टानें कापड धरून ठेवी तेव्हां हंसाची आई जरा लवंडायची कीं पुन्हां बायजाबाईच्या कुंपणांतला कोंबडा आरवतांच घरकामाला उठायची.

हंसाला आईच्या जिवावर कांहीं कमी नव्हतें. तिला कधीं वडिलांची आठवणहि फारशी व्हायची नाहीं. शेजारच्या बायजाबाईची नात, रामनगरची पारू कधीं नव्हत कमलपूरला आली म्हणजे तिच्या

ज्या गप्पा हंसाला ऐकायला मिळत त्या मोठ्या गंमतीच्या असत. 'माझा बा किनई हंसा' अशा सुरुवातीनें तिचें रामनगरपुराण सुरूं झालें म्हणजे क्वचित् खिन्नता येई तिच्या मनाला. अशा रीतीनें तिचें मन उदास झालें म्हणजे तिला नाहीं नाहीं त्या गोष्टी सांगून खूष करण्यांत तिच्या आईचा बराच वेळ जाई.

अशाच एका दिवसाचा प्रसंग हंसाच्या नजरे-पुढून जात होता.

पारूला तिच्या बानें घेतलेली एक चिमुरडी साडी ती मोठ्या डौलानें हंसाला दाखवीत होती. हंसाचें तेवढ्यानेंच बिनसलें. तिची समजूत घालतां घालतां हंसाची आइ तिला म्हणाली,

'हंसा, किती वेडी आहस ग तूं! तुला ह्यापेक्षां सुद्धां चांगली साडी घेईन मी. त्यांत काय एवढें!

'सदान् कदा तूंच त्रास घेणार मला कांहीं आणून द्यायचा,' हंसा फुरगटून म्हणाली,

'मग त्यांत काय झालें?' हंसाच्या आईनें विचारलें—

'अं. पारूचा बाबा तिला सारें आणून देतो—!'
ह्या हंसाच्या वाक्यानें हंसाच्या आईच्या डोळ्यांतून दोन टपोरे अश्रु हंसाच्या गालावर ओघळले. हंसानें दचकून आपल्या आईकडे पाहिलें.

'कां ग आई?' हंसानें विचारलें,

'कांहीं नाहीं हंसा.' पदरानें डोळे कोरडे करीत हंसाची आई म्हणाली, 'अग, पारूच्या बानें तिला साडी दिली तसल्या कितीतरी साड्या तुझे काका दररोज तयार करतात.'

'ते विणकरी आहेत होय?'

'नाहीं! ते मोठ्या गिरणीचे मालक आहेत. पारूची आई, वडील दोघेहि त्यांच्या गिरणींत काम करतात, समजलीस? त्यांच्याकडे आपण गेलों म्हणजे ते वाटेल तेवढ्या साड्या देतील तुला.' ह्या आईच्या वाक्यानें हंसाची कळी उमलली.

पण त्यानंतर लवकरच तिची आई कसल्यातरी दोषी तापानें आजारी पडल्यानें रामनगरला जाण्याचा विचार तसाच राहिला. तिच्या आईचा आजार

म. ग्रं. सं. ठाणे, ...
पा. क्र. ... २१ ...
दि.

दिवसेंदिवस वाढतच गेला. शेजारच्या बायजाबाईंनीं काय हवें नाहीं तें सारें पाहिलें. ‘आई, माझे काका आहेत म्हणतेस रामनगरला, मग त्यांना बोलावूं या पत्रानें—म्हणजे ते तुला औषध देतील चांगल्या डॉक्टराचें’ असें एकदां हंसा म्हणाली. बायजाबाईंनीं तिला दुजोरा दिला. पण का कुणास ठाऊक, हंसाच्या आईनें कांहीं शेवटपर्यंत त्या गोष्टीला मान्यता दिली नाहीं.

आणि एके दिवशीं सकाळींच हंसाची आई हंसाला सोडून गेली. हंसा जगांत एकटी पडली.

बायजाबाईंनीं तिला रामनगरला तिच्या चुलत्या-कडे पाठविण्याचें ठरविलें. तसें तिनें आपल्या लेकाला पत्र टाकलें होतें........

स्वतः बायजाबाई स्टेशनवर तिला पोंचवायला आल्या होत्या. गाडी चालूं होतांच तिचें तोंड कुरवाळून बायजाबाईंनीं हंसाचा निरोप घेतला. ....किती झर्रकन् सारीं चित्रें निघून गेलीं. सिनेमा चालूं असतांना मध्येंच फिल्म तुटावी आणि

क्षणिक अंधार होऊन पुन्हां लख्ख प्रकाश पडावा तसेंच हंसाला वाटलें. गाडीनें दिलेल्या जोराच्या हिसक्यानें हंसा भानावर आली.

गाडी कुठल्या तरी मधल्याच एका स्टेशनावर उभी राहिली. हंसानें आपली नजर आंत घेतली. तिनें तपकीरवाल्या आजोबाला विचारलें, 'आजोबा, अजून रामनगर किती स्टेशनें राहिलें?' 'पुढचेंच स्टेशन रामनगर बाळ!' आजोबा म्हणाले.

'अहो, माझें नांव बाळ नाहीं. हंसा आहे म्हणून सांगितलें ना!' हंसा फणकाऱ्यानें म्हणाली.

इतक्यांत एक तारवाला कुणाची तरी चौकशी करीत हंसा बसली होती त्याच डब्यापाशीं आला. त्या डब्यापाशीं येतांच त्या तारवाल्यानें ओरडून विचारलें,

'किकाभाई मेस्त्री कोण आहे?'

आपलें नांव ऐकतांच वर्तमानपत्राच्या चादरीआड अर्धवट डोळे मिटून डुलकी घेणारा किकाभाई एकदम दचकून जागा झाला. रुमालानें तोंड

पुशीत आणि एक काडी तुटलेला चष्मा डोळ्यांवर चढवीत व त्याचा दोरा कानाला गुंडाळीत किकाभाई म्हणाला,

‘ हां ! काय हाय ? आमीच किकाभाई आहे. ’

‘ तार आहे ! ’ हें त्या तारवाल्यानें निर्विकारपणें उच्चारलेले शब्द ऐकून त्या डब्यांतल्या साऱ्या उतारूंचे चेहरे मात्र विविध विकारांनीं व्यग्र झाले. कुणी आपण दुसरीकडे पहात आहोंत असें वरपांगी दाखवीत आपली नजर मात्र त्या किकाभाईच्या चेहऱ्याच्या तपासणीला पाठवली. कांहींना त्याची दया येऊन अगदीं केविलवाण्या मुद्रेनें ते त्याच्याकडे पहात होते. आमचे तपकीरबहाद्दर मात्र आपलें उपरणें झटकून जरा दोन हात बाजूलाच झाले.

‘ अहो पारशी काका, घ्या ना तुमची ती तार ! ’ हंसाचे हे खडखडीत शब्द ऐकून किकाभाई हंसला आणि सही करून त्यानें तार घेतली.

तारेवरचा मजकूर वाचतांना त्याच्या चेहऱ्यावरचा बदल हंसा न्याहाळीत होती.

इतक्यांत किकाभाई आपली बॅग घेऊन उठलाच जागचा.

'अच्छा हंसाबेन ! ' असें म्हणून त्यानें हंसाचा निरोप घेतला.

'अहो पण पारशी काका, तुम्ही रामनगरला येणार होतां ना ! ' हंसानें विचारलें.

'हां ! पन् आमाला हे तर इथंच उतरायला सांगते ना !' असें म्हणून किकाभाई डब्यांतून खालीं उतरला.

—आणि गाडी पुढें चालूं लागली.

———

## : ४ : रामनगर

ठण् ! ठण् ! ठण् !

घंटेच्या टोल्यांनीं साडेचारची गाडी स्टेशनाच्या आवारांत आल्याची घोषणा केली. सारे उतारू गाडी प्लॅटफॉर्ममध्यें आल्याबरोबर डबा तर प्रथम गांठतां यावा, पण वेगांत येणाऱ्या गाडीच्या फूत्कारा-पासून तर लांब रहावें अशा पवित्र्यांत आपआपलीं बोचकीं घेऊन उभे राहिले. बायका, आपल्याला तर सारें दिसावें, पण आपण मात्र कुणाला दिसत आहोंत असें आपल्याला कळूं नये अशा स्वार्थी आविर्भावांत आपापल्या कंबरेवरचीं मुलें सांभाळीत उभ्या होत्या.

पण आपल्या मातु:श्रीची ही लगबग न पटल्यामुळें कीं काय, त्या कंबरेवरच्या जीवांनीं मोठा सूर काढून एकंदर आपल्या आईबापांच्या धोरणाबद्दल नापसंती व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. पांच सहा वर्षांचीं पारठीं मुलें आत्तांपर्यंत गाडी ही अजब चीज काय असावी ह्या कुतुहलानें मोठ्या आतुरतेनें तिच्या आगमनाची वाट पहात होते. पण पोर्टरनें जेव्हां घंटा वाजवून तिच्या आगमनाविषयीं चार चौघांत बभ्रा केला तेव्हां त्या प्लॅटफॉर्मवर लोटलेली ती भाऊगर्दी पाहून 'भाऊ, ही गाडी नको पण ती गर्दी आवर' असे शब्द तीं मुलें आपल्या केविलवाण्या मुद्रेनेंच जणूं कांहीं बोलून दाखवीत होतीं.

अशा रीतीनें एकंदर जनसमूहाची त्रेधा–तिरपीट करून टाकणारी ती गाडी स्टेशनांत धाड् धाड् करीत येऊं लागली.

त्या आगगाडीच्या धडधडीबरोबर राम मिलच्या कामगारांच्या हृदयाची धडधडहि वाढली होती. सारा तो समाज एखाद्या चवताळलेल्या हत्तीच्या

कळपासारखा भासत होता. त्यांच्यांतलें एक एक नरकुंजर पिचल्या मनगटांच्या सोंडा पिरगाळून राहिले होते नुसते. त्यांच्यांतल्या ज्या कांहीं दहा पांच बायका होत्या त्या आपआपलीं पोरें सांवरून मागेंच उभ्या राहिल्या होत्या. आपल्या नाकावर टिच्चून दुसरीं माणसें गिरणींत कामाला लावून आपल्या पोटावर पाय आणणारा × × 'दुष्ट' ह्या गाडीनें येतो आहे ही कुणकुण त्यांच्या कानावर होतीच. तेव्हां बोटें मोडण्यापासून ते दांत खाण्यापर्यंतचीं सारीं अस्त्रें वापरण्याची त्या आपल्या-कडून शिकस्त करीत होत्या.

पुरुषवर्ग मात्र भलताच खवळला होता. त्या खवळलेल्या मानवसागराच्या लाटा पुन्हां पुन्हां रुळा-पर्यंत जात. त्या रेल्वे पोलिसांना थोपवितां थोपवितां जीव नकोसा होत होता. साऱ्यांच्या तोंडांत एकच शब्द घोळत होता.

'किकाभाई—आणि किकाभाईच.'

'बदमाष....गरिबांच्या पोटावर मारून आपलें पोट जाळणारा लुटारू.'

‘ भांडवलशाही मालकाचा कुत्रा. ’

‘ मजुरांचा मारेकरी—.’

अशा शेलक्या विशेषणांनीं स्टेशनाचें आवार नुसतें घुमत होतें.

‘ गाडी थांबतांच ओढा बाहेर बेट्याला. ’

‘ असा चोपला पाहिजे कीं गाडींत बसून खाल्लेली एक आण्याची गाठी आंतड्यांतून बाहेर पडली पाहिजे—’

‘ बस्स ! किकाभाईचा खिमा करा. ’

असे अत्यंत प्रक्षोभकारक संदेश विद्युत्संदेशापेक्षांहि अधिक वेगानें त्या समूहाच्या ह्या टोंकाकडून त्या टोंकाकडे जात होते....त्या संदेशवाहकांतून कोणी तरी कुजबुजलें.

‘ गार्डाच्या शेजारच्या—अगदीं मागच्या डब्यांत बसून आला आहे चोर. ’

अगदीं गुलदस्तांतली ही बातमी दुसऱ्या कुणालाहि न सांगण्याच्या अटीवर एकमेकांना सांगितली गेली आणि हां हां म्हणतां सगळ्यांच्या

कानोकान गेलेली ती वार्ता सगळ्यांच्या तोंडातोंड झाली.

—आणि गाडी शिरलीच प्लॅटफॉर्ममध्यें. एका मागोमाग एकेक डबे लोकांच्या अंगावरून पुढें निसटूं लागले. हळूं हळूं गाडीचा वेग कमी झाला.

आतां तीनच डबे राहिले....कीं गार्डाच्या शेजारचा डबा....आणि त्यांतला तो किकाभाई.... सेकंद न् सेकंद युगायुगासारखा वाटत होता त्या गिरण कामगारांना.

तीन डबे राहिले.

दोन डबेऽऽ

एऽकऽऽ

गाडी उभीच राहिली. नेमका तो गार्डशेजारचा डबा त्या कामगार मंडळींच्या समोरच आला. भांडवलशाही, मालकवर्ग, किकाभाईसारखा दलाल सारे सारे जरी गरिबांच्या जिवावर उठले तरी अखेर देव गरिबांचा पाठीराखा असतो—

आतां जातो कुठें किकाभाई ?

इतक्यांत एक दोघांनीं मोठा दूरदर्शीपणा दाखविला. ते झटकन् गाडीला वळसा घालून पलीकडच्या बाजूला जाऊन उभे राहिले. न जाणों, एवढी गिरणभाऊंची गर्दी पाहून किकाभाई मागल्या बाजूनें पळायचा.

त्या गार्डाच्या शेजारच्या डब्यांतले उतारू हळूं-हळूं बाहेर पडूं लागले. ते उतारू इतके हळूं उतरत होते कीं, जणूं कांहीं मणामणाच्या बेड्या अडकवल्या होत्या त्यांच्या पायांत. खरें म्हणजे प्रथम किकाभाई डब्यांतून उतरतांना दिसायला पाहिजे—पण—पण उतरला एक मद्रासी अय्या. हा प्रचंड जनसमुदाय आपल्याच स्वागतासाठीं जमला असणार अशी पूर्ण खात्री करून 'गुड् मॉर्निंग जेंटा' असें म्हणत आणि पांढरी स्वच्छ बत्तिशी दाखवीत स्वारी खालीं उतरली. त्याच्या त्या भयंकर आगांतुकपणानें चिडून त्यानें ती दाखविलेली बत्तिशीच तशी बाहेर काढण्याचा विचार एक दोघांच्या डोक्यांत येऊन गेला. पण मग किकाभाईचें काय करायचें ह्या महत्त्वाच्या

प्रश्नानें मद्रासी अय्याला त्यांनीं तसेंच सोडून दिलें. निदान आतां तरी किकाभाई येईल ह्या आशेनें सगळेजण त्या उघड्या तोंडाच्या डब्याकडे तोंड उघडून पहात होते. पण उघडलेलें तोंड जांभईचा आविर्भाव करीत त्यांना मिटावें लागलें. कारण एक शीख सरदारजी आपल्या गळ्यांत अडकवलेलें कृपाण जरा पुढच्या बाजूला करीत खालीं उतरत होते.

एक ना दोन....सात आठ प्रवासी डब्यांतून खालीं उतरले तरी किकाभाई दिसेना. किकाभाईला मारण्याचा उत्साह हळूं हळूं फिका पडूं लागला. कदाचित् आपल्या भीतीनें तो किकाभाई डब्यांत एखाद्या बांकाखालीं लपून बसला असेल असें वाटून आपणच डब्यांत घुसून त्याला बाहेर ओढावा म्हणून कांहींजण वेगानें डब्याकडे धांवले. पण-पण काय? रस्ता बंद.

त्या डब्याच्या दारांत एक प्रचंड व्यक्ति पाठीवर एक मळक्या धोतरांत बांधलेलें बोचकें टाकून उभी

होती. त्या समूहाकडे मारक्या म्हशीप्रमाणें नव्हे, रेड्याप्रमाणें पहाणाऱ्या त्या व्यक्तीचें नाक मधून मधून वर उडवलें जात होतें. त्याला कांहीं तरी बोलायचें असावें असें त्याचा चेहरा तर सांगत होता. पण बोलण्यासाठीं तोंड हलण्याऐवजीं त्याचें नाकच हलत होतें. हा काय प्रकार असावा हें कुणाच्या ध्यानांत येईना. एक दोघे खुणेनें त्या प्राण्याशीं बोलावें ह्या हेतूनें त्याच्या जरा पुढें जाऊं लागले तोंच—

'शीः शीः' असा एकदम आवाज होऊन ते पुढें गेलेले वीर एकदम मागें फेकले गेले.

आणि मग उपरण्यानें नाकतोंड पुसून ती दारांतील व्यक्ति म्हणाली,

'अरे, काय पाहिजे काय तुम्हांला!'

'किकाभाई' अनेकांचा मिळून एक आवाज होत उत्तर आलें.

'पहा, धुंडा सारा डबा.' असें म्हणून ते गृहस्थ आपलें बोचकें सांवरीत खालीं उतरूं लागले.

आतांपर्यंत दारांत ही प्रचंड भिंत उभी असल्यानें त्यामागचा लुकडा किकाभाई आपणांस दिसला

नाहीं. आतां ती भिंत नाहींशी होतांच किकाभाईच आपणांस दिसणार अशा लालसेनें सगळेजण डब्याकडे पाहूं लागले.

ते गृहस्थ खालीं उतरले.

त्या डब्यांतल्या दाराकडे पाहून सारा तो कामगारांचा घोळका कपाळाला हात लावून मटकन् खालींच बसला.

दारांत एक व्यक्ति उभी होती.

विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

: ५ :

# मैत्रीण

हंसा आपली छोटीशी पिशवी हातांत घेऊन डब्यांतून खालीं उतरण्याच्या पवित्र्यांत उभी होती. तपकीरवाल्या म्हातारबाबांच्या प्रचंड शरीराचा आडपडदा बाजूला झाल्याबरोबर तिला जें दृश्य पहावयास मिळालें तें पाहून तीहि आश्चर्यानें स्तिमित झाली. इतके लोक एका ठिकाणीं जमलेले ती प्रथमच पहात होती. ते जमावानें तर तिथें गोळा झालेच होते. पण हंसाला मजा वाटली ती ह्या गोष्टीची कीं, आपल्यासारख्या एका चिमुरड्या पोरीला पाहून ते सारे कामगार मटकन् खालीं बसले.

आपणांस पहातांच त्यांचे चेहरे पडण्याजोगें आपल्या चेहऱ्यांत विशष काय होतें ह्याचा उमज तिला पडेना. एखाद्या शिपाईदादाला पाहून दहा पांच शेंबडीं पोरें जशीं सर्द व्हावींत त्याप्रमाणें आपल्या-सारख्या छोट्या छोकरीकडे पहातांच हे शेंपन्नास कामगार असें माना मोडून पडायला आपण खऱ्या-खुऱ्याच कोणी मोठ्या आहोंत कीं काय म्हणून मोठ्या डौलानें आपली नजर आपल्याच शरीरावरून हलकेंच फिरविण्यास सुरुवात केली .... पाय तेच.... झगा तोच पांढऱ्या कबुतराच्या पिसाऱ्याप्रमाणें पसरलेला .... आणि त्यावर रुळलेले दोन पेड .... तेंच इवलाशा फुगल्या गालांचें गोड मुखकमल आणि त्यावर झेपा घेणारे भुंग्यांना लाजविणारे काळे कुरळे .... अगदीं तीच ती हंसा होती. मग त्या काम-गारांना काय झालें ?

पण होते कुठें आतां तिथें ते कामगार—किकाभाई कांहीं मिळाला नाहीं म्हणून निराशेनें जड झालेलीं पावलें तशींच ओढीत एकेकानें स्टेशनांतून काढता

पाय घेतला. हळूं हळूं स्टेशनावरची गर्दी पूर्णपणें ओसरली.

हंसा खालीं उतरली. रामनगर स्टेशनवर तर आपण उतरलों .... आतां पुढें काय ? काकांचें घर कसें सांपडणार ? ह्या प्रश्नांनीं गोंधळलेली हंसा जरा तिथेंच स्तब्धपणें उभी राहिली.

'हंसा ऽ ऽ' एक परिचित हांक हंसाच्या कानावर आली. हंसानें वर पाहिलें. आणि जें दिसलें तें पाहून ती खुदकन् हंसली. ढगाळलेलें आकाश क्षणभरानेंच चांदण्यानें धुवून निघून तेजानें निथळावें तशी हंसरी हंसा दिसत होती. ती धांवतच गेली आणि पारूचा हात धरीत आणि त्या हाताला गिरक्या देत म्हणाली—

'पारू, तूं ग कशी इथें ? .... तुझ्या वडिलांना स्टेशनवर येण्याविषयीं बायजाबाईंनीं लिहिलें होतें ना ? मग त्यांनीं तुला ....आणि अय्या ! पारूच्या आई, तुम्हीहि आहांत.'

ती हंसाची बोलण्याची गडबड पाहून पारूची

आई गालांतल्या गालांत हंसूं लागली.

' हंसाबाई....ह्या संपाच्या घाईंत त्यांना कांहीं ध्येनांतच राहिलं नाहीं....आत्याबाईनीं धाडलेल्या कागदाचं....ते व्हतेच ह्या गर्दींत....पण इतरां-बरोबर गेले पुढें....आम्हीबी चाललों व्हतों. पण पारूनें तुम्हांला हेरलं म्हणून बरं झालं .... तुम्ही मात्र आमच्या कामगारभाईंची मोठी मजा केलीत ' असें म्हणून पारूची आई पुन्हां हंसूं लागली.

' मी काय मजा केली ? '....हंसानें विचारलें.

' अव, आमचे लोक तो मेला पारशी आतां डब्यांतनं भाइर पडल, मग भाइर पडल म्हणून मारं वाट पाहून होते....सारा डबा रिकामा व्हायची वेळ आली....आतां अगदीं तो पारशीच धावणार म्हणून आमचे सारे लोक टवकारून उभे होते.... पण पहातात तों तुम्ही पुढं उभ्या. अगदीं खजील झाले सारे लोक....' पारूची आई म्हणाली.

' कोणता पारशी मनुष्य पाहिजे होता त्यांना ? ' हंसानें विचारलें.

‘ अव, तो संपफोड्या किकाभाई ? ’

‘ कोण पारशी काका होय ? ’

‘ हां हां पारशी काका....बोका मेला ! ’ पारूच्या आईनें कडा कडा आपलीं बोटें मोडलीं.

त्या तिघींचें एवढें बोलणें होईपर्यंत त्या तिघीहि स्टेशनाच्या आवाराबाहेर पडल्या.

‘ पारू, आपण बग्गींत बसून जाऊं या. ’ हंसा म्हणाली.

‘ अवं, इथं बग्गी कुठली आली या ? ’ पारूची आई म्हणाली.

‘ अं हंसा, इथं टांगे हायती पुन्यावानी. ’ पारूनें तेवढाच आपल्या ज्ञानाचा तोरा मिरवला.

‘ अय्या ! मला वाटलें इथें मुंबईसारख्या बग्या असतील....आमच्या मीरा आत्याबरोबर मुंबईला गेलें होतें ना मी, तेव्हां बग्गींत बसलें होतें. कशी सुंदर ती बग्गी आणि किनीय् ’ सुर्रर्र करून तोंडाला सुटणारें पाणी तसेंच आंत घेत हंसा पुढें बोलूं लागली. ‘ काळी काळी भोर....मऊ मऊ

गाद्या बसायला....अन् तो बग्गी चालवणारा कसा उंचावर बसायचा....मला वाटायचें तिथेंच बसावं.... पण आत्या म्हणाली शोभत नाहीं आपल्याला.... कां ती तसें म्हणाली कुणाला ठाऊक. मला कांहीं समजलें नाहीं त्या वेळेस. पण आतां वाटतें तिला येत नसेल इतक्या उंचावर बसतां ? '

' कां ? ' एक बोट केसांतनं झरकन् फिरवीत पारूनें विचारलें.

' अग, आमची आत्या म्हणजे काय चुरमुऱ्याचें पोतें....त्या बग्गींत चढतां चढतां ती काय घामाघूम झाली....मग इतक्या उंचावर ? शक्यच नाहीं.... आणि त्या बग्गीचा घोडा इतक्या डौलानें चालायचा कीं फोटो काढावा जसा. ' हंसाचें हें बग्गीपुराण बरेंचसें लांबणारसें पाहून पारू मध्येंच म्हणाली, ' हं, पण काय करायचें हंसाबाई; इथें नाहींत ना बग्गया ! '

पारूच्या ह्या वाक्यानें एकदम आवाज उतरून हंसा म्हणाली, ' बरें, टांगा तर टांगा बाई....टांगा

टाकीत चालण्यापेक्षां या तुझ्या टांग्यांतनं जाऊं या. पण त्यांतल्या त्यांत बरा टांगा पहावा नाहीं का पारूच्या आई ? '

' तर हो ! ' असें म्हणून पारूची आई जरा पुढारली, इतक्यांत दोघे तिघे टांगेवाले चाबूक सरसावून आलेच त्यांच्यापाशीं.

' काय बाई, टांगा पाहिजे ? ' एकानें डोक्याची टोपी मांडीवर झटकीत आणि लांब पिचकारी फूटपाथवर टाकीत विचारलें.

त्याच्या त्या भयंकर वेषावर नजर रोखीत हंसा म्हणाली, ' तुझा नको बाबा टांगा....तुझे कपडे फारच घाणेरडे आहेत. ' हा फटकळ सवाल ऐकून तो टांगेवाला चाबूक गुंडाळीत चालता झाला. तो जातो न जातो तोंच दुसरा म्हणाला,

' आपला टांगा आहे ना ताईसाहेब. '

' कोणता ? ' हंसानें विचारलें.

' त्यो पल्याडचा ! '

' तो फाटक्या गादीचा ? नको रे बाबा ! '

'आपला टांगा अगदीं नवा कोरा आहे बाईसाहेब.' तिसरा आवाज आला.

त्याच्या त्या नवेपणानें चमकणाऱ्या टांग्याच्या पुढें जरा नजर टाकून हंसा म्हणाली, 'अरे, तुझा टांगा नवा असूं दे; पण तुझें घोडें अगदीं मरायला टेकलेंय्. आम्हांला घरीं नेईपर्यंत तरी जिवंत राहील का नाहीं कुणास ठाऊक?'

शेवटीं पारूच्या आईनें एक टांगा ठरविला आणि तिघी त्यांत बसल्यावर टांगा चालूं लागला.

'हंसाबाई, अगुदर आमच्या घरीं चला. मग काकांच्या घरीं जायचेंच आहे तुम्हांला!' टांगा चालू झाल्यावर पारूची आई म्हणाली.

'हो, पण पारूच्या आई, मघांशीं तुम्ही तें संपाचें का कायसें म्हणत होता आणि त्या पारशी काकाला शिव्या देत होता तें कांहीं मला समजलें नाहीं.' मघांशीं अर्धवट राहिलेलें बोलणें हंसानें पुन्हा सुरूं केलें.

'अव, पारूचे वडील तुमच्या काकांच्याच

गिरणींत नोकरीला आहेत ना? त्या गिरणींतल्या साऱ्या मजुरांनीं संप केलाय्....ते कामावर जात नाहींत....' पारूची आई म्हणाली.

'अय्या! भलतेच आळशी दिसताहेत हे लोक....' काम न करून कसें चालेल....माझी आई नेहमीं म्हणत असे ' जो करी काम त्याचा वाली श्रीराम ! '....आणि पारशी काकाला कां शिव्या दिल्यात....? '

' अवं, तो दुसरे लोक आणतो कामाला ! '

' मग काय बिघडलें....अरे वा....म्हणजे तुमचे हे मजूर भलतेच शहाणे दिसतात....आपणहि काम करायचें नाहीं आणि दुसऱ्यांनाहि काम करूं द्यायचें नाहीं....मग तुमचे सारे लोक त्या पारशी काकाची कशाला वाट पहात होते.....'

' त्याला चांगला बडवायला ! '

' अय्या....बरें झालें तो पारशी काका अगोदर-च्याच स्टेशनवर कसला तरी कागद आला म्हणून उतरला. ' हंसा लांब सुस्कारा टाकीत म्हणाली.

‘ हां. त्या शेठजीनेंच त्याला अगोदर तार केली असेल....’ टांगेवाला मागें वळून मध्येंच म्हणाला.

‘ अहो टांगेवाले बुवा, त्या घोड्याच्या मानेवरची ती गोमाशी हांकला....मघांपासून पहातें आहे मी ती माशी त्याच्या मानेवर घिरट्या घालीत आहे .... जरा लक्ष द्या आपल्या घोड्याकडे ’ हंसा म्हणाली.

‘ चक् चक् ’ करीत टांगेवाल्यानें आपली नजर जी का एकदां पुढें टाकली ती कांहीं पुन्हां माघारीं वळविली नाहीं.

थोड्याच वेळानें टांगा मधींच थांबला. तो कां थांबला म्हणून हंसानें मान उंचावून पाहिलें. स्टेशनावर किकाभाईची वाट पाहून दमलेला कामगारांचा मेळावा मोठ्या त्वेषानें ‘ गिरणीवर चला....मालकाला गांठा ’ अशा आरोळ्या ठोकीत चालला होता.

‘ कुणाची मिरवणूक चालली आहे कुणास ठाऊक ? ’ हंसानें विचारलें.

‘ अव, त्याच मगाच्या कामगारांची ! ’ पारूच्या आईनें उत्तर दिलें.

‘ म्हणजे काम सोडून असा धिंगाणा घालायला हे लोक वेडे तर नाहींत ? ’

‘ अव, पोटासाठीं करतात तें सारें हें. ’

‘ पोटासाठीं . काम करावं....अशा लोकांना शिपायांच्या ताब्यांत द्यावयास हवें.’ हंसा म्हणाली.

इतक्यांत एक मोटार कर्र खर्र असा ब्रेकचा आवाज करीत तेथें थांबली.

‘ अगबाई ! आतां काय होतंय् कुणास ठाऊक ? ’ पारूची आई घाबरून म्हणाली.

---

## : ६ : गोळीबार

तासन् तास स्टेशनवर ताटकळून देखील, संप फोडण्यांत वस्ताद असणारा किकाभाई मेस्त्री हातीं लागला नाहीं म्हणून सारे कामगार अगदीं चिडून गेले होते.

किकाभाई हा मुंबईस रहाणारा एक पारशी दलाल होता. त्यानें आपले असे शेंपन्नास भाडोत्री मजूर तयार करून ठेवले होते. ज्या गिरणींत संप होई त्या गिरणीच्या मालकाकडून भरपूर पैसे घेऊन जास्त रोजमुऱ्यावर तो आपले मजूर त्या गिरणींत कामाला पाठवीत असे. तात्पुरता तीन चार

दिवसांचा प्रश्न असल्यानें मालकवर्गहि असा भारी पगार द्यावयास राजी असे. अशा रीतीनें संप होऊनहि गिरणीचें काम चालूं राही. मालक मजुरांच्या मागण्या ठोकरून लावीत असत. पांच सहा दिवस उपासमारीनें काढावे लागले म्हणजे मजुरांचा पहिला जोर खलास होत असे आणि मग एकेक जण पूर्वीच्याच पगारावर बिनशर्त कामगार रुजूं होई. अशा रीतीनें निरनिराळ्या गिरण्यांचे संप फोडण्यांत यशस्वी झाल्यानें किकाभाईला मजूरवर्ग 'संपफोड्या' ह्या यथार्थ नांवानें संबोधीत असत.

ह्याच कामगिरीसाठीं राम मिलच्या मालकांनीं, जयरामदास शेठजींनीं किकाभाईला रामनगरला बोलावलें होतें. म्हणूनच तो शेठजींशीं करारमदार करण्यासाठीं रामनगरला येत होता. पण वाटेंतच एका स्टेशनवर शेठजींची तार हातांत पडल्यानें तो त्याच स्टेशनवर उतरला होता. आणि म्हणूनच त्याला बडविण्याच्या बाबतींत कामगारांची मनस्वी निराशा झाली होती.

ह्या निराशेनें तर हे कामगार फारच खवळले. चार पांच दिवसांच्या उपोषणानें अंगांत त्राण जरी फारसें राहिलें नव्हतें तरी खवळलेल्या ज्वालामुखीचें स्वरूप त्या खवळलेल्या जनसमुदायाला आलें होतें. एकीकडे हातपाय लटपटत होते तर एकीकडे हातांच्या मुठी वळल्या जात होत्या. अशा संतप्त अवस्थेंत ते सारे कामगार स्टेशनच्या बाहेर पडले होते. त्यांच्या म्होरक्यानें बाहेर येतांच सर्वांना उद्देशून इषारा दिला;

'चला गिरणीकडे.... मालकाला खडा सवाल विचारायला चला ....'

'आमच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत.' ही एकच आरोळी दुमदुमली तिथल्या त्या वातावरणांत. ह्या नव्या उत्साहाच्या धुंदीनें आपलीं पोटें रिकामीं आहेत हेंहि क्षणभर ते विसरले. मालकवर्गाची धुंद उतरविण्यासाठीं संघटित झालेला, विदीर्ण वस्त्रांत झाकलेल्या विदीर्ण शरीराचा तो मजूरवर्ग नवचैतन्यानें रसरसलेला होता जसा. त्यांचीं शरीरें असमर्थ होतीं तरी त्यांचीं मनें समर्थ होतीं. आणि

तीं पुकारीत होतीं, " आमच्या मागण्या पुऱ्या करा.'

' मजूर संघटनेचा विजय असो. '

' भांडवलशाही नष्ट करा. '

' गरिबाला भाकरी द्या. '

' महात्मा गांधी की जय. '

' पंडित जवाहरलाल नेहरू की जय. '

अशा रणघोषांनीं दुमदुमणारी ती मजूर सेना राम मिलवर चाल करून जात होती.

आलीच राम मिल.

त्या गिरणीपुढें आतां बराच समुदाय जमला होता. जे जे कामगार स्टेशनवर आले नव्हते ते देखील इथें सामील झाले होते. गिरणीकडे पाहून कामगार मोठमोठ्यानें ओरडत होते.

गिरणीचें काम बंदच होतें. गिरणीचें फाटक बंद करून भय्या आंतल्या बाजूस उभा होता.

' मालकसाहेब बाहेर या ! ' त्या जमावांतून आलेली आरोळी गिरणीच्या फाटकावर आदळली.

' अरे, मालक कशाला आतां बाहेर तोंड दाखवतील ? ' दुसरा आवाज आला.

‘ आंत घुसून मालकांना बाहेर ओढा....’

‘ गिरणींत घुसा....’

एकच गिल्ला झाला सगळीकडे. त्या साऱ्या गर्दीनें जणूं कांहीं एका प्रचंड हत्तीचें रूप घेऊन त्या गिरणीच्या फाटकावर टकरा घ्यायला सुरुवात केली होती....

‘ खळ्ळ् खळ्ळ् ’ एक दगड लांबून भिरभिरत आला....एका खिडकीच्या तावदानावर तो आदळला आणि त्या तावदानाची कांच खळकन् फुटली. ....इतक्यांत खर्रर्र असा एकादी मोटार थांबल्याचा आवाज झाला....कांहींनीं मागें वळून पाहिलें; त्यांच्या नजरा जरा भेदरल्याच....पण बाकीचे मागें पहाण्याच्याहि शुद्धींत नव्हते....फाटकावरून गिरणींत उतरण्याचा कांहींचा प्रयत्न चालू होता.... आणि इतर जोरानें फाटक ढकलीत होते.

त्या थांबलेल्या मोटारींतून पोलिस भराभर बाहेर पडले आणि शिट्या वाजवून त्यांनीं आपल्या आगमनाची वार्ता त्या कामगारांना कळविली. तरी तो

समूह मागें हटण्याचें लक्षण दिसेना....तेव्हां....

'ठोऽठोऽ....' दोनच बार झाले. ते हवेंतले बार करण्यासाठीं उंचावलेली आपली बंदूक इन्स्पेक्टरसाहेबांनीं खालीं करायच्या आंतच सारे मजूर तिथून पसार झाले होते.

'मित्रे भागूबाई!' इन्स्पेक्टरसाहेबांनीं आपल्या हाताखालच्या शिपायांकडे पहात दंतपंक्ति विचकल्या आणि मग त्या शिपायांनाहि तसेंच प्रत्युत्तर द्यावें लागलें. सारे पोलिस पुन्हां मोटारींत बसले आणि मोटार खरखर आवाज करीत आली तशी निघून गेली.

—आणि मग आमच्या हंसाच्या टांग्याला पुढें जायला वाट मोकळी मिळाली. हा सारा प्रकार पाहून हंसा अगदीं भांबावून गेली होती. लोक एवढी गर्दी कां करतात आणि पोलिस दिवाळी अजून चार दिवस लांब आहे तोंच कां फटाकडे वाजवितात हें कांहीं तिच्या ध्यानांत येईना. आणि दुसऱ्यांनीं आपटबार वाजवले कीं आपण लहान

मुलें पहायला जमत असूं आणि शिपायांनीं केलेले बार ऐकून हे लोक पळून कां गेले....अशा मनां-तल्या नाना प्रश्नांना मोकळी वाट करून देण्यासाठीं हंसानें अखेर पारूच्या आईला विचारलेंच.

' पारूच्या आई, त्या शिपायांनीं कसले बार केले हो ? '

' अव, बंदुकीच्या गोळ्या उडविल्या त्यांनीं ! ' पारूची आई म्हणाली.

' बंदुकीच्या गोळ्या ?....अगबाई ! म्हणजे लढाईच झाली कीं....पण पारूच्या आई, ते गिरणी-वाले कुठे बंदुका घेऊन आले होते लढायला ? अं....' हंसाचा चेहरा पुन्हां प्रश्नचिन्हांकित झाला.

'असंच हाय हंसाबाई ह्या जगांत. तुमच्या काका-सारखे गिरणीचे मालक, पोलिस सारे सारे गरिबांचे काळ हायती....' पारूच्या तोंडून आलेला काकांच्या नांवाचा उल्लेख ऐकून हंसाच्या चिमुकल्या नाकाचा शेंडा अलगद उडवला गेला आणि ती मोठ्या फणकाऱ्यानें म्हणाली—

ठाणे.
३६६४ नों.
१५.१५

‘ आमच्या काकांनीं काय केलं हो ! ’

‘ आलेंच आपलें घर ! ’ ह्या पारूच्या उद्गारांनीं हंसाचा प्रश्न तसाच अर्धवट लोंबकळत्या स्थितींत राहिला.

टांगा उभा राहिला. टुणकन् उड्या मारून हंसा आणि पारू धांवतच घरांत शिरल्या....दारांतून आंत पाऊल टाकतांच हंसा एकदम आश्चर्यानें थबकली. तिला नकळतच तिच्या तोंडून अभावितपणें प्रश्न बाहेर पडला.

‘ कोण, पारशी काका ? ’

———

## : ७ : पारशी काकाचा कावा

'रामनगरपर्यंत जाऊं नका. अलीकडच्याच स्टेशनवर उतरून मोटारीनें या.'

अशा आशयाची जयरामदासांची तार मिळतांच किकाभाई गाडींतून उतरला होता. जयरामदासांनीं अशी तार कां केली असावी याचा उलगडा त्याला होईना. रामनगरला उतरण्यांत काय धोका असावा हें त्याला उमगेना. नाना विचारांचें गांठोडें डोक्यांत सांभाळीत तो स्टेशनाच्या आवाराबाहेर पडला. बाहेर आल्यावर त्याला मोटारीची वाट पहाण्यासाठीं फार वेळ घालवावा लागला नाहीं-

रेल्वेचीच बस रामनगरला जाण्यासाठीं पांच एक मिनिटांत निघणार होती. ताबडतोब फ्रंट सीटची जागा किकाभाईनें बळकावली.

नास्ता उरकून ड्रायव्हर आपल्या जागेवर स्थानापन्न झाला. गीयर वगैरे मोटारींतल्या यंत्रसामुग्रीला दोन तीन हिसके देऊन ड्रायव्हरनें मोटार आतां बहुतेक ' इष्टार्ट ' होणार अशी आशा उतारू वर्गांत निर्माण केली. पण इतक्यांत ' फुर्रर फस् ' अशा चमत्कृतीपूर्ण आवाजानें मोटारीनें एक दीर्घ सुस्कारा सोडला. मोटारीला आतां पाणी पाजण्याची वेळ आली आहे असें गंभीर चेहऱ्यानें त्या ड्रायव्हरनें मागें बसलेल्या क्लीनरला, समोरच्या आरशांत पहात ओरडून सांगितलें तेव्हां मात्र सगळ्यांच्या तोंडचें पाणी पळालें.

तरी पण त्या दिवशीं मोटारीला उतारूंची लौकरच दया आली आणि ती त्यांना आपल्या अंगाखांद्यावर टणटणा उडवीत आपला रस्ता कापूं

लागली. अशा रीतीनें ती मोटार सरळ मार्गावर लागलेली पाहून निर्धास्त मनानें कांहीं बडबड्या उतारूंच्या गप्पा सुरूं झाल्या.

‘ काय घेलाशेट, राम मिलचा संप काय म्हणतोय् ’ तळहातावर चुन्याशीं एकरूप केलेली तंबाखू पटकन् तोंडांत टाकीत एका पोक्तशा गृहस्थांनीं आपल्या शेजारीं बसलेल्या शेटजींना विचारलें.

‘ काइ विचारतोस मास्तर ! सारा घोटाळा केला ये संपानें....सारा मगज खाल्ला आमचा....तुमचे पोरे लोक संप करते त्याचा काय एवढा नाय.... तुमाला सुटीबी मिळती आन् काय दीड दोन रुपये रोज असेल तो बी लागू होतोय्....पन् आमचा साला तसा नाय....समदा बिझिनेस एकदम खालीं बसते ना....जयरामदास शेटजी लाख मानूस....पन् पार वेडा झाला या संपानें.... काय मास्तर, बडीशेप घेते ? ’ असें म्हणून शेटजींनीं थोडी बडीशेप मास्तरांच्या हातावर ठेवली.

तोंडांत तंबाखू होती म्हणून बडीशेप खाण्याची

कांहीं सोय नव्हती; पण पुन्हा केव्हां तरी उपयोगी पडेल या दूरदर्शी धोरणानें मास्तरांनीं ती बडीशेप खिशांत टाकली.

' पण का हो शेटजी, जयरामदास शेटजी मजुरांच्या मागण्या मान्य कां करीत नाहींत? त्यांच्या रक्तावर हे शेटजी लाल होत आहेत मग मजूर संप कां करणार नाहींत?'

हातांतल्या एका हातोडा—कोयता छाप साप्ता-हिकावर दुसऱ्या हाताची मूठ आपटीत एक पिंजारलेल्या केसांचे गृहस्थ शेटजींना विचारते झाले.

' ए बाबू, तुमचा ते रशियाचा हिशेब ठिव बाजूला. जरा बिझिनेस कर म्हणजे समजेल काय भानगड आहे ही तें. मजुरांच्या मागण्या वारंवार पुऱ्या करायला गिरणीवाल्यांच्या गिरण्या म्हणजे कांहीं धर्मशाळा नाहींत. हा धंदा आहे. काय साडेतीन दिवसांचें शिराळशेटी राज्य नाहीं हें .... ह्या खेपेला मजुरांच्या संपाला अजिबात भीक न घालण्याचें जयरामदास शेटजींनीं ठरविलें आहे.'

शेटजी तावातावानें म्हणाले.

‘ ठरवतील तर काय ! तो मुंबईचा किकाभाई बोलावला आहे ना तेवढ्याचसाठीं संप फोडायला.’ तो पिंजारल्या केसांचा गृहस्थ म्हणाला.

हे भयंकर शब्द कानांवर पडतांच मागल्या बाजूला बोलत बसलेल्या उतारूंकडे वळलेली किका-भाईची कावळी नजर जी पुढच्या बाजूला वळली ती रामनगर येईपर्यंत मोटारखालीं धांवत जाणाऱ्या रस्त्यावर एकसारखी खिळली होती. तोंडावरचा वर्तमानपत्री पडदा कांहीं शेवटपर्यंत बाजूला झाला नाहीं.

खर्र खर्र आवाज करीत मोटार रामनगरच्या स्टँडवर उतारूंना बरेचसे हिसके देत थांबली एकदांची.

मोटार थांबतांच त्या पिंजारलेल्या केसांच्या भाईची नजर चुकवीत किकाभाई जो तिथून निसटला तो राम मिलच्या नजिक असलेल्या शिवा जॉबरच्या चंद्रमौळी झोपडीपाशीं दाखल झाला. किकाभाई

तिथें यायला व शिवाहि तिथें यायला एकच गांठ पडली. शिवा तिथें आला तों अगदीं धांवतच आलेला दिसत होता. त्याच्याबरोबर दुसरेहि दोघे तिघे मजूर होते. त्यांना पहातांच किकाभाई जरा आडोशाला झाला.

‘ राम राम शिवादादा ’ असें म्हणून शिवाचा निरोप घेऊन ते मजूर निघून गेल्यावर शिवा आपल्या घराचें कुलूप काढूं लागला तोंच ‘ शिवा ऽ ’ अशी हळूंच हांक किकाभाईनें दिली. किकाभाईचा आवाज ओळखून शिवानें त्याच्याकडे पाहिलें आणि नजरेनेंच त्याला गप्प रहाण्याची सूचना करून कुलूप उघडलें. दार उघडल्यावर दोघेहि आंत गेले आणि एका कांबळ्यावर बसले. ‘ काय शिवा, काय बातमी ? ’ किकाभाईनें दबकत विचारलें.

‘ अगदीं माझ्या गळ्याला तांत लागायची पाळी आलीय् .... संप तर जोरांत हाय् .... आतां तर गोळीबार झाल्यानें लोक जास्तच खवळले .... त्यांतून तुमचा पत्ता नाहीं. तेव्हां म्हटलं आतां मेलं सारं

काम.' शिवा म्हणाला.

'शेटजींनीं तार केली म्हणून मी अलीकडच्या स्टेशनवर उतरून मोटारनें आलों.'

'ते बी बरं झालं....नाहीं: तर तुमची चांगली गांठी–पापडीच वळली असती....मी मात्र बाबा, हीं दोन दोन नाटकें करतां करतां दमलों. मजुरांच्या कांहीं ध्यानीं येऊं नाहीं म्हणून त्यांच्यांत मिसळून संपाचें नाटक मला करायला लागतं ....इकडे तुम्ही म्हणताय् संप फोडायला मदत कर....जीवाचा धोका पत्करून तुमच्या नादीं लागलोया त्यें कांहीं जन्माचें कल्याण व्हईल या हिशोबानें....पन् अजून कांहीं तुमच्या पिशवीचें तोंड सैल होण्याचें लक्षण दिसत नाहीं....' शिवाचा आवाज चांगलाच चढल्यासारखा भासत होता.

'अरे, इतका घाई करून कसा चालेल शिवा!' शिवाच्या पाठीवर हात ठेवून किकाभाई समजावणीच्या स्वरांत बोलूं लागला, 'माझी तर ही

अशी गडबड....अजून शेटजींची गांठ घेऊन सौदा पक्का व्हायचा....पन् त्ये काय शेटजीच्या बंगल्यांत पाय टाकायचा अवकाश कीं नोटांची भिंडोळीं खिशांत कोंबून येते आम्ही....तुझा हा आंकडा ठरलाय अगदीं नक्की.' असें म्हणून किकाभाईनें त्याच्यापुढें पांच बोटें नाचवलीं.

'अरे, पण पारशी भाई हा तुमचा सौदा व्हायला अजून दोन तीन दिवस तर हवेत....तोंपर्यंत आम्ही काय पोटांत कांटे भरायचे?....तुम्ही मला असें गप्प बसवताय....पन् माझीं माणसें नुसतीं खायला उठलींत!' शिवा म्हणाला.

'कांहीं कर पण तीस चाळीस माणसें राखून ठेवलींच पाहिजेत....माझीं माणसें आहेतच.... शेटजींना आंकडा पटला कीं गिरणी सुरू झालीच पाहिजे....दिवाळीला नाट• नाय लागला पायजे असा शेटजीचा सांगावा आहे....मग काय शिवा, ....थोडी कळ काढ....जरा दम धर' किकाभाई अगदीं विनवणीच्या स्वरांत म्हणाला.

'तें कांहीं नाहीं. अगोदर हात जरा ओला झाला तर जमेल, नाहीं .... ' शिवाच्या आवाजाचें स्वरूप पाहून किकाभाईनें गुपचुप, जरा आंबट चेहरा करून कातड्याचें पाकीट अलगद उलगडलें.... आणि न कळत एक हिरवी नोट काढून त्यानें ती शिवाच्या हातांत सारली तोंच—

'कोण? पारशी काका?' हा हंसाचा आवाज त्यांच्या कानांवर आदळला.

त्या आवाजाबरोबर पारशी काका चांगलेच गडबडले. तें उलगडलेले कातडी पाकीट बंद करतांना त्याची इतकी धांदल उडाली कीं, एका हातानें बटन खटकन् दाबूं लागले तों तें बटन दाबलेंच जाईना. कां दाबलें जात नाहीं म्हणून ते पहातात तों दुसरा हात अजून पाकिटांतच होता. मग त्यांनीं तो बाहेर काढून पुन्हां पाकीट लावलें.

किकाभाईंनीं दिलेली ती हिरवी नोट पागोट्यांत खुपसतांना शिवाचीहि मोठी फजिती उडाली. ती नोट पारूच्या आईला दिसूं नये म्हणून त्यानें घाई

केली खरी, पण ती नोट तर पागोट्यांत बसली नाहींच, पण तें पागोटें मात्र सुटून खालीं आलें .... आणि तो कागद–ती हिरवी नोट खालीं पडली. ....

‘बाबा, कसलाव हिरवा कागूद!’ पारूनें विचारलें.

‘काय नाय, काय नाय!’ करीत शिवानें तो कागद कनवटीला लावला.

‘काइ न्हाइ म्हणतायसा अन् मग ह्यो पारशी कशापाई आलाया? कुनी पाह्यलं कीं, जिवं मारतील ना?’ पारूची आई संतापली होती.

तिच्या रागाचा पारा चढलेला पाहून किकाभाईनें आपलें चंबूगबाळें आवरलें आणि झोपडीबाहेर काढता पाय घेतला.

हा सारा काय प्रकार आहे हें हंसाच्या डोक्यांत येईना. आपल्या इवल्याशा मेंदूला–किकाभाई गाडींतून पळणें, त्याला मारण्यासाठीं स्टेशनवर मजुरांचें जमणें, काम न करतां गिरणीवर दगड मारीत सुटणें, असें ते करीत असतां त्यांना

न पकडतां पोलिसांनीं उगीचच फटाकडे उडवणें, आणि आतां किकाभाईनें पारूच्या बापाला हिरवा कागद दिल्यानें पारूच्या आईचें खवळणें—ह्या साऱ्या भानगडींचा कांहीं उलगडा पडतोय् कीं काय हें पहाण्यासाठीं हंसा जरा वेळ डोक्याला हात लावून दाराशीं उभी राहिली....पण आपणांस कांहीं ही विचार करण्याची भानगड जमायची नाहीं असें ठरवून तिनें डोक्याला लावलेला हात झटकन् खालीं घेतला.

पारूची आई बरीच रागावलेली पाहून शिवा जरा वरपांगी दमदार आवाजांत म्हणाला, ' कोन कशाला येतंय् ? तूंच आरडाओरडा करून सारी गल्ली गोळा करशील. '

' तुम्ही असें घरभेद्यागत वागाया लागलांत तर अळीच काय पन् उभा गांव गोळा झाला तरी कमीच हाय ! ' पारूची आई कडाडली.

हें त्या नवरा–बायकोचें कडाक्याचें भांडण पाहून घाबरलेल्या पारू हंसांच्या बावरल्या नजरा

इकडून तिकडे नुसत्या भिरभिरत होत्या.

'गांवाच्या नादीं लागूनशान् उपाशी मरायचा वखत आला....' हें शिवाचें वाक्य पारूच्या आईच्या वाक्यानें अर्ध्यावरच तुटलें.

'समजला तुमचा कावा....थांबा. ओरडून सारी आळी इथें यायची नाहीं. मी बोलवूनच आणतें साऱ्यांना....' असें म्हणून पदर खोचून पारूची आई रागानें दाराकडे वळली....ती त्वेषानें बाहेर निघाली होती. पण दाराकडे पहातांच तिचें पाऊलच पुढें पडेना.

दारांत एक निराळीच व्यक्ति उभी होती.

---

: ८ :

## शिष्टमंडळ

पोलिसांनीं केलेल्या दोनच वायबारांनीं मजुरांचा प्रक्षुब्ध जमाव पार पांगला गेला होता. जो तो वाट फुटेल तिकडे पळाला होता. गिरणीवर दगडफेंक करणारें धैर्य आतां प्राणभयानें भीतीच्या पोटांत दडलें होतें. कुणी कुणासाठीं थांबण्याचीहि पर्वा केली नाहीं. अशा गोंधळांत शिवा जों निसटला तों त्यानें घर गांठलें होतें. शिवादादा आपणांतून गेल्याचें कुणाच्याच ध्यानांत आलें नाहीं. साहजिकच प्रत्येकजण आपल्या शरीराच्या पिंजऱ्यांतून आपला

प्राण उडून जाणार नाहीं एवढेंच पहात होता. मालकांनीं आपल्या मागणीला तर वाटाण्याच्या अक्षता लावल्याच आणि वर शिवाय गोळीबार केला म्हणून जो तो अगदीं खवळून गेला होता. शब्दांनीं मालकाचा सूड घेण्याचें ठरविलें जात होतें तर पायांकडून उलटीच अंमलबजावणी होत होती.

अखेर ते पळते पाय 'थांबा' ह्या एकाच गंभीर शब्दानें जागच्या जागीं थबकले. सूडाची भाषाहि ओसरली आणि पायांचा पळपुटेपणाहि स्थिरावला. डोळ्यांतला त्वेषहि मावळला आणि चेहऱ्यावरचा भित्रेपणाहि नाहींसा झाला. सारे पाय मंतरल्याप्रमाणें मुकाट्यानें एकत्र येऊं लागले. एका वडाच्या पारापाशीं ते सारे मजूर कोंडाळें करून बसले. साऱ्यांच्या नजरेचा विषय एकच होता....

—पारावर गंभीरपणें उभे असलेल्या बापूः भय्यांच्याकडे सगळ्यांचे डोळे लागले होते.

एक खादीचा पंचा नेसलेला, त्यावर एक खादीचा सदरा, डोक्यावर कांहीं नाहीं, वाढलेले

केस आणि दाढी हवेशीं खेळत असलेली, हातांत एक सोटा, नजर खोल गेलेली. पण त्या खोलींतहि तेज लकाकत होतें. चेहऱ्याची ती भव्यता आणि आवाजाची गंभीरता ! पावित्र्याची मूर्तिमंत मूस होती जशी कांहीं ! नंदादीपाच्या तेजानें काळोखहि जसा उजळतो त्याप्रमाणें त्यांच्या दर्शनानें पापहि पुण्य होत असे. आपलें सारें जीवन देशसेवेसाठीं वाहणारे ते रामनगरचे बापूभय्या म्हणजे रामनगरच्या गरिबांचा एक मोठा विसांवा होता. म्हणूनच अशा प्रक्षुब्ध स्थितींत त्यांच्या अमृतवाणीची कामगारांना आवश्यकता होती. ते आतां काय म्हणत आहेत इकडेच साऱ्यांचें लक्ष केंद्रित झालें होतें.

'भाई' बापूभय्यांच्या गंभीर वाणीचा प्रवाह सुरूं झाला. 'पळण्यानें तुमचा कार्यभाग कसा होईल ? राग आणि भीति दोन्ही नाशास कारण होतात. शांति सगळ्यांचा समन्वय करते. तुम्ही पळाला तर तुमचें नीतिधैर्य नाहींसें होईल. त्यानें तुमच्या लढ्याचा पायाच ढांसळेल आणि मग

तुम्हांला अपयशाचें वांटेकरी व्हावें लागेल. प्रथम आपणांस अपरिचित अशा मार्गावर पाऊल टाकूं नये.... तें टाकल्यानंतरहि अत्यंत विचारानें पुढें जावयास हवें .... तुम्ही गिरणीवर दगडफेंक करावयास नको होती.... किकाभाईला मारायचा विचार करावयास नको होता.'

बापूभय्यांच्या ह्या वाक्याबरोबर एक अस्पष्टसा हुंकार त्या समूहांतून निघून हवेंत विलीन झाला.

'किकाभाईचा राग येणें साहजिक आहे. .... पण तरीहि तो राग गिळावयास हवा होता..... हा विचार महात्माजींच्या शिकवणुकीशीं सुसंगत नाहीं. जी शिकवण आपण आज इतकीं वर्षें शिकत आलों, जिच्या बळावर आपण आपला देश स्वतंत्र केला, त्या शिकवणीशीं हें वर्तन विसंगत आहे. .... आणि आपण स्वतंत्र झाल्यानंतर तर हें असें वागणें आत्मघातकीपणाचें आहे. राममिल ही जयरामदासांची नाहीं .... ती देशाची आहे .... ती कांहीं दिवस बंद पाडून तुम्ही जयरामदासापेक्षांहि—

देशाचेंच नुकसान अधिक केलें आहे.'

'म्हणजे आम्ही संपच करावयास नको होता, असें तुमचें म्हणणें आहे म्हणायचें, बापूभय्या !' मधींच कुठून तरी एक आवाज आला.

'हो !' ह्या बापूभय्यांच्या उद्गाराबरोबर पुन्हां एकदां मधमाशा उठल्याप्रमाणें सगळीकडे गोंगाट झाला.

'तुमच्या मागण्या मान्य होण्यासाठीं तुम्ही संप देखील करावयास नको होता असेंच माझें म्हणणें आहे !' बापूभय्या पुढें बोलूं लागले, 'पारतंत्र्यांत जे मार्ग परकीय सरकारविरुद्ध आपण उपयोगांत आणले तेच मार्ग स्वातंत्र्यांत स्वकीय सरकारविरुद्ध आपण उपयोगांत आणणें बरोबर नाहीं. पारतंत्र्यांत जी पद्धत देशसेवा म्हणून गौरविली गेली ती स्वातंत्र्यांत गुंडगिरी म्हणून संबोधिली जाते.'

'मग आम्ही काय करावयास पाहिजे....?' कोणी तरी विचारलें.

‘ नेहरू सरकार तुमचा प्रश्न सोडवीतच आहे. पण अनंत अडचणींतून त्याला मार्ग काढावयाचा असल्यानें कांहीं विलंब लागणारच....तोंपर्यंत तुम्ही तुमच्या मागण्या समजुतीच्या स्वरानें जयरामदास शेटजींना कळवा. त्यांना त्या पटविण्याचा आटोकाट प्रयत्न करा. शांति, सत्य, त्याग व सत्याग्रह ह्या मार्गाची कास सोडूं नका.’ असें म्हणून बापू-भय्या थांबले.

‘ मग बापू, तुम्हीच आमचे पुढारी व्हा. जयरामदास शेटजींच्याकडे जाण्यासाठीं....आमचें शिष्टमंडळ घेऊन तुम्हीच चला शेटजींकडे.’ एक तरुण बापूभय्यांच्या जवळ येऊन म्हणाला.

‘ बापूभय्या आणि शिवादादा....’ दुसऱ्या कुणी तरी नांव सुचवलें.

शिवादादाचें नांव निघतांच शिवा कुठें आहे म्हणून सगळेजण इकडे तिकडे पाहूं लागले. पण शिवा तिथें नव्हताच तर सांपडणार कसा ?

‘ तुम्ही घरोघर जा .... मी शिवाकडे जाऊन

सांगतों सारा प्रकार त्याला .... तुम्ही जा आतां शांतपणें घरीं.' असें बापूभय्यांनीं सांगितल्यावर सारे मजूर मुकाट्यानें आपापल्या घरीं गेले.

ते दिसेनासे झाल्यावर बापूभय्या शिवाच्या घरीं जाण्यास निघाले. चार पांच मिनिटांतच ते शिवाच्या घराशीं आले. ते आंत जाणार तोंच 'सारी आळी बोलवून आणतें' हे पारूच्या आईचे शब्द त्यांच्या कानांवर आदळले. ते दारांतच थबकले.

दारांत उभ्या असलेल्या त्यांच्या त्या धीरगंभीर मूर्तीकडे पाहून शिवा आणि पारूची आई दोघेहि अगदीं थिजून गेले. पारूच्या आईचा राग कुठल्या कुठें निघून गेला आणि डोक्यावर पदर ओढून ती बाजूला उभी राहिली. ओशाळगत मुद्रेनें पागोटें सांवरीत शिवा उभा राहिला आणि अदबीनें बापू-भय्यांना म्हणाला,

'राम राम बापूभय्या!'

'राम राम' म्हणत बापूभय्या जवळच टाकलेल्या कांबळ्यावर बसले. खालीं बसल्यानंतर मजुरांचा

विचार कसा बदलला आहे आणि शिष्टमंडळ घेऊन जयरामदास शेटजींच्या भेटीला जाण्याचें कसें ठरलें आहे वगैरे साऱ्या गोष्टी बापूभय्यांनीं शिवाला सांगितल्या. ते बोलत असतांना शिवाची मुद्रा एखाद्या अपराध्याप्रमाणें झाली होती. त्याच्या चेहऱ्यावरचा सारा बदल पारूच्या आईची नजर अगदीं बिनचूक टिपून घेत होती. बापूभय्यांच्या गंभीर वाणीनें आणि त्यांच्या तीक्ष्ण दृष्टीनें शिवाच्या मनांतलें अशिव पार शिवनिर्माल्य झाल्यागत पारूच्या आईला स्पष्ट भासत होतें.

" मग येणार ना शेटजीकडे ? ' असें म्हणून बापूभय्या उठलेच जागचे.

' व्हय तर ! सारीं माणसें जमस्तवर आलोंच नव्ह कां मी. ' असें म्हणून शिवा बापूभय्यांना पोंचवायला म्हणून दारापर्यंत गेला.

' बापू भय्या आले म्हणून आमच्या घरीं आलेली अवदसा माघारीं गेली. ' पारूची आई पाठमोऱ्या शिवाकडे पाहून हंसत म्हणाली.

शिवानें तिच्याकडे न पहातांच पारूला हांक मारली, ‘ पारूऽ ’

‘ काय बाबा ! ’ पारू आंत आली.

‘ अग पारू, हंसाबाई कुठं हायती ! ’ पारू एकटीच आंत आलेली पाहून पारूच्या आईनें घाबरून विचारलें.

‘ अन् मला काय ठाव ? ’ पारूहि चमकून एकदम म्हणाली.

‘ म्हंजी ऽ ’ असें म्हणून पारूची आई घाबऱ्या घाबऱ्या बाहेर गेली.

———

## : ९ : जयरामदास शेटजी

पारूच्या आईचें आणि वडिलांचें तें कंटाळवाणें भांडण ऐकून हंसाला अगदीं नकोसें झालें. पारूहि त्या प्रसंगाला घाबरून घराबाहेर गेली होती. कुणाचें लक्ष आपणाकडे नाहीं असें पाहून हंसाहि झोपडीबाहेर पडली. बाहेर आल्यावर तिनें जरा इकडे तिकडे नजर टाकून पाहिलें. पण पारू कांहीं आसपास दिसली नाहीं. कांहीं तरी विचार मनाशीं ठरवून चुटकी वाजवून हंसा सरळ रस्त्याला लागली होती. फर्लांग दोन फर्लांग चाल झाल्यावर वाटेंत एक पोस्टमन घाईनें चाललेला तिला दिसला. हंसा

धांवतच त्याच्यामागें गेली. त्याच्या कोटाला धरून थांबवीत हंसानें त्याला विचारलें,

" काय हो पत्रवाले, आमच्या काकांचा बंगला माहीत आहे तुम्हांला ? '

' तुमच्या काकांचा ? ' हंसाकडे कौतुकानें पहात पोस्टमन म्हणाला, ' कोण तुमचे काका ? '

' आमचे काका माहीत नाहींत तुम्हांला ? मग पत्र टाकायचें काम कसें करतां हो तुम्ही ? ' मिटल्या ओठांच्या पाकळ्यावर एक नाजुक अंगुली ठेवीत मोठ्या ठसक्यानें हंसा म्हणाली.

तिचा तो अभिनय पाहून जास्तच हंसत पोस्ट-मननें तिला पुन्हां विचारलें, ' अहो पण बाईसाहेब.'

' वा ! वा ! बाइसाहेब म्हणायला मी काय एखादी आजीबाई आहे वाटतं....हंसा आहे म्हटलं मी ! '

हंसाच्या या सरबत्तीपुढें पोस्टमनचा अर्ध्यावरच तुटलेला प्रश्न त्यानें पुन्हां जोडून घेतला.

' बरं हंसाताई....तुमच्या काकांचं नांव सांगि-तल्याखेरीज आम्ही त्यांचा बंगला तुम्हांला कसा सांगायचा बरं ? "

'अय्या खरंच ! मग अगोदरच कां नाहीं म्हणालांत तसं....' असें म्हणून हंसानें आपल्या काकांचें नांव त्या पोस्टमनला सांगितलें. तेव्हां पोस्टमननें तिला हाताशीं धरून लौकरच एका मोठ्या बंगल्यापाशीं आणून सोडलें.

त्या बंगल्याच्या फाटकापाशीं उभी राहिलेली हंसा त्या प्रचंड फाटकाच्या गजांतून आंतल्या बंगल्याची पहाणी करीत होती. सुंदरशी बाग केलेली होती त्या बंगलीच्या आवारांत. चित्रविचित्र रंगांचीं फुलें हिरव्या पानांच्या सोबतीनें वाऱ्यावर हिंदकळत होतीं. मधून गेलेल्या पायवाटा हिरवळीवर ओढलेल्या पट्ट्याप्रमाणें दिसत होत्या. मधींच उभा ठाकलेला तो निळसर रंगाचा बंगलाहि मोठा खुलून दिसत होता. तें सारें वैभव पाहून आपले काका 'किती श्रीमंत आहेत ' असा एक विचार हंसाच्या मनांत येऊन गेला....तो विचार ओसरतो न ओसरतो तों ह्या प्रचंड फाटकाचा आडोसा बाजूला होऊन आपण बंगल्यांत कसा प्रवेश मिळवायचा हा प्रश्न हंसापुढें उभा राहिला.

वा. वा.
१८९१

इतक्यांत बागेंतल्या पायवाटेनें जाणारा...एक अवाढव्य पाठमोरी आकृति हंसाला दिसली. गुडघ्या-पर्यंत कसलेल्या धोतराला झाकणारा तो पायघोळ सदरा, डोक्यावरची ती छोटीशी पांढरी टोपी, तो मनगट—जाडीचा सोटा आणि चढावा खालीं सांपडल्यामुळें कुरकुरणारी ती पायवाटेची वाळू पाहून हंसाच्या मनांत त्या भय्याबद्दल एक प्रकारचा भीतियुक्त आदर उत्पन्न झाला. त्याला आपली हांक ऐकूं जाईल का नाहीं याचा फारसा विचार न करतां गजांच्या फटींतून तोंड घालण्याचा प्रयत्न करीत हंसानें हांक दिली—' भय्याजी, ओ भय्याजीऽऽ '

ह्या हाकेबरोबर मागें वळून भय्याजी फाटकापाशीं आले. फाटकावरून त्यांची नजर आंवतीं भोंवतीं फेरफटका करूं लागली. त्यांच्या त्या उंच्या पुऱ्या शरीरामुळें त्यांच्या नजरेच्या टापूंत जवळच उभी असलेली इवलीशी हंसा कांहीं येईना. शेवटीं त्या गजांतनं आंत हात घालून हंसानें भय्याजींचा खमीस ओढला आणि पुन्हां एकदां हाक मारली तेंव्हां

भय्याजींचें लक्ष तिच्याकडे गेलें. त्यांनीं फाटक उघडलें....फाटक उघडतांच हंसाची छोटी मूर्ति दिसतांच भय्याजी किती तरी वेळ आश्चर्यानें तिच्याकडे पहातच होते.

' क्यँव....छोकरी ? ' भय्याजीनें तिला कांहीं तरी विचारण्याचा प्रयत्न केला.

' आँ ऽ ? ' हंसानें उलट त्यांना विचारलें.

' आपलें हिंदी कांहीं ह्या पोरीला समजणार नाहीं असें पाहून भय्याजींनीं तिला पुन्हां सुधारल्या भाषेंत विचारलें,

' काय काम हाय तुझा ? '

' माझें काम होय....' हातांतली पिशवी जरा तोंडापुढें आडवी धरून आणि त्याच हातानें केस थोडे सरसे करून हंसा म्हणाली, ' अहो, मी माझ्या काकाकडे रहायला आलें आहे. '

' काकाकडे रहायला आली हाय् ? मग हिथ कशाला आली ? ' भय्याजींनीं विचारलें.

' मग ! माझ्या काकाच्या इथें रहायला मी कांहीं तुमच्या घरीं येऊं काय ? '

‘ ये, घर काय तुमच्या काकाचा आहे ? ’

‘ नाहींतर काय तु–’ हंसानें झटकन् जीभ चावली.

‘ हे जयरामदास शेटजी तुझा काका आहे ? ’

‘ मग ? ’

‘ म्हणजे इथें शेटजीला कुणी काका म्हणायला हाय तर....आव ’ असें म्हणून भय्याजी बंगल्याकडे गेले. त्यांच्या पाठोपाठ हंसाहि आंत गेली. बंगल्याच्या व्हरांड्यांत पाऊल ठेवतांच तिथें असलेल्या पायपोसावर ती आपले पाय पुसूं लागली. दोन्हीं हातांनीं झग्याचीं टोंकें धरून तो जरा उचलून धरीत मोठ्या डौलानें तिचे ते पाय पुसणें चाललें होतें. एक एक पंख पसरून, डुरकी चाल घेत, पिसांत तोंड खुपसणारें एकादें गोजिरवाणें कबूतर जसें दिसतें तशी हंसा भय्याजीच्या नजरेंत नाचत होती. आपल्याकडे कौतुकानें पहात उभ्या राहिलेल्या भय्याजींकडे पहात हंसा म्हणाली,

‘ तुम्ही घाण झालेले पाय पुसत नाहीं ? ’

‘ हो तर, न्हाई कसा ’ असें म्हणून भय्याजींनीं आपले पाय त्या पायपोसावर घासले.

‘ भय्याजी, तुम्ही किती वेळां पाय घासतां ? ’ भय्याजींच्या पायांकडे पहात हंसानें विचारलें,

‘ मी चांगले दहा वेळां पाय असे खराखरा घासतें म्हणजे सारी घाण निघून जाते....नाहीं तर नुसतं एकदांच घासल्यासारखें केलें ना म्हणजे पायाची घाण तर नाहींच निघत, उलट पायपोसाची घाण पायाला लागते. ’

‘ ऐसा....आमी मोजत नाहीं किती वेळां घासतों तें ’ भय्याजी म्हणाले.

‘ बरोबर आहे. आई म्हणत असे कीं, मोठ्या माणसांना पुढें असें दरखेपेला मोजायला लागत नाहीं. मोजून मोजून इतकी संवय होते कीं, नेमके दहा वेळां पाय घासले जातातच त्यांचे.... पण भय्याजी, मोजले नाहीं तरी माती निघेल इतके घासलेच पाहिजेत पाय नाहीं का ? ’ भय्याजींच्या पायांकडे पुन्हां एकदां पहात हंसा म्हणाली.

हंसाची लबाड नजर ओळखत घाईनें पाय घासून भय्याजी दिवाणखान्याच्या दारापाशीं गेले. हंसाहि त्यांच्या मागोमाग आपली पिशवी सांवरीत गेली. आपल्या पाठोपाठ आलेल्या हंसाला तिथेंच थांबायला सांगून भय्याजी दार तिरकेसें करून दिवाणखान्यांत गेले.

तेवढ्याच त्या फटींतून त्या दिवाणखान्याचें लखलखतें वैभव हंसाचे डोळे दिपवीत होतें. चकाकणारीं कपाटें, खुर्च्या, टेबलें, भिंतिवरचे आरसे, तसबिरी, खालीं अंथरलेले मऊ मऊ रेशमी गालिचे जसें कांहीं श्रीमंतीचें प्रदर्शन भरलें होतें तिथें. कोपऱ्यांत एका टेबलापाशीं एक ठेंगणीशीच आकृति एका खुर्चीवर बसली होती. डोक्यावर थोड्या शिल्लक राहिलेल्या केसांवर मधून मधून हात फिरत होता. कपाळाच्या मध्यतेंत त्या टकलानें जरी भर घातली होती तरी कपाळावरच्या आठ्यांनीं त्या मध्यतेवर तितक्याच रेघोट्या ओढल्या होत्या. नाक अगोदरच बिटकेसं होतें. त्यांत डोक्यांवर ठेवलेल्या

चष्म्यानें त्याचें खुजेपण आणि किलकिल्या डोळ्यांचें मोठेंपण चांगलेंच वाढविलें होतें. गालिच्यावर वाजलेल्या भय्याजींच्या हलक्या पावलांनींहि त्यांना न झेपणाऱ्या एका लठ्ठ वहींतील आंकडेमोडींत गुंतलेली त्यांची नजर वर झाली. तोंडावरच्या सुरकुत्यांत एक दोन सुरकुत्यांची भर टाकून शेटजींनीं चेहऱ्यावर मूर्तिमंत प्रश्नचिन्ह धारण केलें. त्या प्रश्नचिन्हानें विचारलेला ' काय ? ' हा प्रश्न लक्षांत आल्यासारखें दाखवीत भय्याजी दबक्या आवाजांत म्हणाले,

' कोई आया है ! '

' जाव....मेल्लीशिवाय मी कुणाला भेटणार नाहीं जाव. ' ह्या शेटजींच्या गर्जनेबरोबर फटींतून पहाणाऱ्या हंसाच्या हातांतली पिशवी एकदम खालीं पडली. ती हलकेंच उचलीत पुन्हां पुढचें संभाषण ऐकण्यासाठीं हंसानें आपला कान दिला.

' ऐसा नाहीं शेटजी आपकी— ' भय्याजी पुढें सांगूं लागला. पण—

‘ हमारी कोई नाहीं जाव....’ ह्या शेटजींच्या वाक्यानें भय्याजींचें वाक्य कांहीं पूर्ण झालें नाहीं.

शेटजींनीं पुन्हां त्या जाड पुस्तकांत नजर घातली. तेव्हां भय्याजींचा नाइलाज झाला. ते मुकाट्यानें बाहेर आले. दिवाणखान्याचें दार तसेंच लोटून ते हंसाला कांहीं सांगण्यासाठीं म्हणून पाहूं लागले.

तों हंसाच तिथें नव्हती.

## : १० : काका आणि पुतणी

दार ओढून घेऊन भय्याजी निघून गेल्याची खात्री झाल्यावर दारामागें लपलेली हंसा हल्कीं पावलें टाकीत अलगद् जयरामदास शेटजींपाशीं येऊन उभी राहिली. शेटजींची नजर जाड भिंगाच्या चष्म्यांतून त्या मोठमोठ्या वहींतल्या आंकडेमोडींत गुंतून राहिली होती. मनांतल्या मनांत शंभर आंकडे मोजीत आतां काका आपणांकडे पहातील, मग पहातील असें करीत हंसा गुपचूप उभी होती. परंतु शंभराची मोजदाद दोनतीनदां होऊनहि काकांची नजर आंकड्यांच्या कड्यांतनं सुटत नाहीं

असें पाहून हंसानें टेबलावरचें एक छोटेंसें पुस्तक हलकेंच खालीं पाडलें. त्या आवाजानें दचकून जयरामदास शेटजी एकदम ओरडले, ' भय्याजी ऽऽ'

' नमस्ते काका ! ' हंसानें संधि साधली.

' काका ? ' हंसाकडे आश्चर्यानें पहात जयराम-शेटजी म्हणाले.

' मी नाहीं तुम्ही ! ' हंसा धिटाईनें बोलली.

' मी काका ? कुणाचा ? '

' माझे ! '

ह्या हंसाच्या शब्दानें काकांच्या कपाळावर आठ्यांचें जाळें दुपटीनें विणलें गेलें. त्यांनीं डोळ्यां-वरचा चष्मा काढून एकदां हंसाकडे पाहिलें. आणि धोतराच्या सोग्यानें चष्मा पुसून व तो डोळ्यांवर चढवून पुन्हां एकदां त्यांनीं हंसाला न्याहाळून घेतलें. त्यांच्या त्या गोंधळलेल्या वृत्तीची कींव येऊन हंसा म्हणाली, ' मी हंसा,....'

' हंसा ? कोण हंसा ? चल जा इथून ? आलीस कोठून तूं ? ' रागानें हात चोळीत काकांनीं विचारलें.

‘ कमलपूरहून ! ’ आपल्या काकांचा तो कडवट चेहरा पाहून हंसानें हलकेंच विचारलें, ‘ काका, तुमच्या तोंडांत काय आहे ? ’

‘ मधींच प्रश्न विचारूं नकोस....माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे आणि मग....पण असले मूर्खपणाचे प्रश्न विचारायचे नसतात. ’ काका गुरगुरले.

‘ बरं ! ’ तोंडाचा चंबू करीत हंसा म्हणाली, ‘ मी एखादे वेळेस एरंडेल तेल घेतलें म्हणजे माझें जसें तोंड होतें तसें तुमचें झालेंय् म्हणून विचारलें.... बरं तुम्ही काय विचारलें ? ’

‘ तूं कमलपूरहून आलीस ? ’ आपल्या डोक्यावर हात चोळीत काका म्हणाले, ‘ हंसा....कमलपूर हिराभाबी....’ असे कांहीं शब्द, त्यांच्या पुटपुटत्या ओठांतून निसटलेले हंसाच्या कानानें झेलले.

‘ हं हं काका....माझ्या आईला सारे म्हणत हिराभाबी. ’ हंसा एकदम म्हणाली.

‘ हिराभाबीची हंसा तूं ? ’ जरा गंभीर चेहरा करीत काकांनीं विचारलें.

‘ हं ! ’

‘ मग तुझी आई कुठें आहे ? ’

एक बराच मोठा आवंढा गिळीत हंसा म्हणाली, ‘ काका....रडूं नका हं. आई मेली ’ असें म्हणून हंसाला एक मोठा हुंदका आला.

‘ मेली ? ’

‘ हं देवाघरीं गेली ! ’

‘ केव्हां ? ’

‘ पांच सहा दिवस झाले ! ’

‘ कोण कोण होतें तिथें ? ’

‘ मीच ! ’

‘ तूंच ? तूं एकटीच होतीस ? ’

‘ हो ! ’

‘ एकटी ? ’ पापणीसुद्धां न हालवितां ताट-कळत्या नजरेनें काकांनीं विचारलें, ‘ अन् तुझे मामा, मावशी कोणीच नव्हत्या ? ’

एका पायाला झोका देत आणि गुलाबाच्या

कळीसारखें दिसणारें आपलें नाक दोन बोटांनीं धरल्यासारखें करीत हंसा म्हणाली.

'कोणी नव्हतें....आणि कोण येणार अशा वेळेला? मावशीच्या मुलाचें लग्न होतें....आणि मग मामाला आणि मावशीला दोघांनाहि येतां आलें नाहीं....' हंसाच पुढें म्हणाली, 'अन् मामा मला म्हणाला देखील मग कीं आईच्या शेवटच्या वेळीं त्याला येतां आलें नाहीं म्हणून त्याला फार वाईट वाटत होतें म्हणून. पण काय करणार? मावशीच्या मुलाचें लग्न निघालें ना!'

'बरोबर! असेच वागायचे ते....मला बेट्यांचे शब्द अगदीं ऐकल्यासारखे वाटत आहेत....दिसताहेत त्यांचे लबाड चेहरे माझ्या दृष्टीला.' काका रागानें खालचा ओठ दोन्ही दांतांनीं चावत म्हणाले.

काकांच्या नजरेच्या रोखानें पहात हंसानें आश्चर्यानें विचारलें, 'खरंच?'

तिची ती मजेदार नजर पाहून आणि तो प्रश्न ऐकून काका एकदम हंसले.

जयरामदास शेटजी आज हंसले.

मनापासून बाहेर पडलेल्या त्या हास्याच्या विरल पडद्यानें चेहऱ्यावरच्या सुरकुत्या किती सहज झाकून टाकल्या. आईच्या शेवटच्या घटकेला सुद्धां मामा आणि मावशी नव्हते याचें हंसाच्या बालमनानें केलेलें स्पष्टीकरण त्यांना मोठ्या कौतुकाचें वाटलें.... ‘ किती मोकळें मन....किती साधे आणि स्वच्छ विचार....अशा निर्मळ मनाचा अनुभव आपणांस येईल का....हं. पुन्हां कुणाला कधीं ल्हान मूल होतां आलें आहे का ? ’ असे निरनिराळे तुटक विचार फक्त संपत्तीची मोजदाद करण्याची संवय असलेल्या जयरामदास शेटजींच्या डोक्यांत नव्यानें शिरत होते....अगदीं अपरिचित असा अनुभव होता हा.

पुन्हां ते हंसले....आणि त्या हास्याचा खोल असा प्रतिध्वनि त्यांना जाणवला. शांत अशा मध्यरात्रीच्या सुमारास सतारीची एकच तार छेडली गेल्यानंतर जी एक गोड नादलहरी काळोखांत घुमत रहाते

त्याप्रमाणें अननुभवित अशा सुखाची एक लहर जयरामदासांच्या शरीरांत उत्पन्न झाली. ती लहर तशीच आंत दाबण्याचा आविर्भाव करीत काका हंसाला म्हणाले, ' पण हंसा, तुझें इथें रहाणें किती अवघड आहे याचा विचार केला आहेस का? तो भय्याजी डोक्यावर उभे रहाणें जितकें शक्य आहे तितकेंच तुझें इथें रहाणें शक्य आहे. '

' अय्या....भय्याजी: डोक्यावर उभे रहातात? खरंच? ' हंसानें झटकन् उडी मारून विचारलें.

' हं....विचार तूं त्याला. पण तूं इथं रहायचं म्हणजे फार अडचणी आहेत. '

काकांच्या ह्या वाक्यावर चिंतातुर मुद्रेनें विचार करीत हंसा म्हणाली, ' माझी पाठ धुण्याची तेवढी अडचण आहे....कारण माझी पाठ मीच कशी धुणार? '

काका पुन्हां एकदां हंसले आणि म्हणाले, ' पाठ धुण्याचें काय ग विशेष? तें होईल! '

' हात्तेच्या, मग काय? बाकीचें सगळें येतें

मला. ’ हंसा हात झाडीत म्हणाली.

काकांचें मन पार गोंधळून गेलें होतें....कुव्या विचारांच्या अंधारकोठडींत कोंडून रहावयाला वर्षानुवर्षे सरावलेलें मन मोकळ्या विचारांच्या सूर्य-प्रकाशांत आल्यावर बावरलें होतें....हें सुख सहन होत नव्हतें त्या मनाला—हंसाच्या मोकळ्या शब्दांनीं, निर्मल हास्यानें त्यांच्या वृत्तीला जो आज हा ताजेपणा आला होता तो किती विलोभनीय होता—पण नवखा होता तो. हंसा आपल्यासारख्या संन्यासी माणसाच्या रुक्ष जीवनांत आली तर हा ताजेपणा, हें नवजीवन आपणांस कायम लाभेल....पण मग नेहमींचा शिळा जीवनक्रम; त्याचें काय करायचें ? वीस वर्षांचा यांत्रिक क्रम कसा सोडायचा ?.... अशा अनुकूल—प्रतिकूल विचारांनीं काकांचें मन व्याप्त झालें होतें. तरी पण चेहऱ्यावर मात्र किरकोळ अडचणींची काळजी वाटत असल्याचा अभिनय त्यांनीं चालू ठेवला होता.

—‘आणि तुझा अभ्यास ? तो कसा काय करणार

इथें तूं ? ' काकांनीं विचारलें.

' मला आई शिकवीत होती. ' हंसा म्हणाली, ' आणि तुम्हांला देखील मला शिकवितां येईल.... कारण आईनें मला जें पुस्तक दिलें आहे तें तुमचेंच आहे. आईनेंच सांगितलें मला. तुम्हीं केलेल्या पेन्सिलीच्या खुणा सुद्धां आहेत त्याच्यावर. '

असें म्हणून हंसानें लगबगीनें आपल्या पिशवींतील दोन तीन चुरगळलेलीं पुस्तकें बाहेर काढलीं. खालीं फतकाला मारून, गालीचावर पुस्तक धरून तें साफ करीत हंसानें काकांना विचारलें.

' पाहिलेंत हें पुस्तक....तुमचेंच ना ?....आणि हें ? आठवतंय् ? '

' हं ! ' त्या पुस्तकाकडे पहात काका म्हणाले. हंसानें त्यांतल्या एका पुस्तकाचें पान उलगडलें. त्या पानावर बोट ठेवीत हंसा म्हणाली,

' ह्या पहा तुमच्या खुणा....आणि काका, ह्या बाईला तुम्ही मिशा कां हो काढल्यात ? '

काका गालांतल्या गालांत हंसत त्या पुस्तकाकडे

पहात होते. त्या पुस्तकाचे दुमडलेले कोपरे, पान उघडण्यासाठीं वारंवार अंगठा ओला करून पानाला लावल्यानें त्यावर उमटलेले ते काळे काळे अंगठ्याचे ठसे, आणि हंसानें दाखविलेलें तें मिशावाल्या बाईचें चित्र पाहून काका क्षणभर स्वतःचें मोठेपण विसरले. मोठा गंभीरपणा करून पानें उलटणाऱ्या त्या सध्यांच्या हंसाच्या मूर्तींत त्यांना त्यांची स्वतःचीच बालमूर्ति दिसूं लागली.... एकदां असेंच तें कांहीं तरी वाचायचें म्हणून एक मोठें चित्र असलेलें पान काढून बसले होते. तेव्हां त्यांच्या आईनें त्यांना एक ऊन ऊन चिरोटा दिला. त्यांनीं तो तसाच पुस्तकावर ठेवून हळूं हळूं पोटांत रवाना केला होता आणि मग—

'काका, ह्या चित्रावर एवढा मोठा तुपट डाग कसला हो?' हंसाच्या ह्या प्रश्नानें काकांच्या नजरेपुढें तरळलेलें एक रम्य चित्र झटकन् नाहींसें झालें. आणि समोरच्या आरशांत एक टक्कलानें भूषित झालेला आणि सुरकुत्यांनीं चितारलेला सुतकी चेहरा

दिसूं लागला. हंसाच्या प्रश्नावर हंसत त्यांनीं त्या आरशांतल्या चित्राकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला, पण तें चित्र अधिकच भेसूरपणें हंसत होतें. शेवटीं त्यांनीं आपल्या खुर्चीचें तोंडच वळविलें.

'आई म्हणत असे बरं का काका,' हंसा म्हणाली, 'हें गोष्टींचें पुस्तक तुम्हांला फार आवडायचं म्हणून....त्यांतली ही 'परोपकारी संभू'ची गोष्ट आई मला नेहमीं सांगे. ती तुम्हांला फार आवडत होती नाहीं काका ? तो परोपकार करणारा दयाळू संभू तुम्हांला फार आवडायचा. आतां आवडतो कां काका तुम्हांला तो ?'

ह्या हंसाच्या प्रश्नानें काका एकदम इतके दचकले कीं, त्यांच्या हातांतली ती लठ्ठ वही एकदम खालींच पडली.

'आणि ही कविता तुम्हांला कधीं नीटशी समजली नाहीं असें आई म्हणत असे....हें पहा त्या कवितेचें चित्र....' हंसाचें तोंड चालूच होतें, 'एक मुलगा फुलपांखरूं पकडत आहे, एक तरुण

माणूस ऐटीनें झाडावरच्या दोन पांखरांकडे: पहात चालला आहे, आणि तुमच्यासारखा हा म्हातारा कपाळावर हात ठेवून एका बाकावर बसला आहे. किती छान चित्र. पण तुम्हांला त्या ·चित्रांचा आणि कवितेचा अर्थ समजत नव्हता ना ?....'

काकांना तीं चित्रें आणि त्यांच्या पुढची ती कविता स्पष्ट दिसत होती....कवितेंतला शब्दन् शब्द त्यांच्या डोक्यावर जणूं कांहीं घाव घालीत होता. एकाकी जीवनाचें दुःख पैशाच्या आवरणा-खालीं झाकण्याचा त्यांनीं आजपर्यंत प्रयत्न केला होता. पण एवढें मोठें लठ्ठ आवरणहि हंसाच्या सहवासानें आज बाजूला ओढलें गेलें आणि ती एकाकीपणाची आग किती तरी तीव्रतेनें जाणवूं लागली. जें दुःख आज कित्येक वर्षें त्यांच्या हृदयांत सलत होतें, पण पैशाच्या गुंगीनें तें दुःख आहे हें जाणण्याची त्यांची शक्ति पार नाहींशी झाली होती. ती आज हंसाच्या अमृतमधुर शब्दांनीं पुन्हां त्यांना मिळाली होती.

बराच वेळ झाला तरी काका बोलत नाहींत असें पाहून हंसानें पुन्हां काकांना विचारलें.

‘ काका, आतां तुम्हांला त्या कवितेचा अर्थ समजला का हो ? ’

खुर्चीवरून उठून इकडे तिकडे जड पावलांनीं येरझारा घालीत काका म्हणाले,

‘ हो ! ’ पुन्हां एक फेरी घेऊन खुर्चीकडे आल्यावर हंसाच्या पाठीवर हात ठेवून काका म्हणाले, ‘ हंसा, तुला रहायचं न माझ्याजवळ ? ’

‘ हो ! ’ हंसा काकाकडे जरा भित्र्या नजरेनें पहात म्हणाली.

‘ ठीक आहे ! ’

‘ खरं ? ’ एक गिरकी घेत हंसानें विचारलें.

हंसाच्या हंसऱ्या चेहऱ्यावर हास्याच्या जाईजुई फुलल्या होत्या. त्यावरचें दंवहि अजून कसें टपोर मोत्यांसारखें दिसत होतें. ऊन–पावसाचा गोड खेळ तिच्या मुखकमलावर कसा गोड दिसत होता. गालाच्या गुलाबावरच्या त्या पाणीदार डोळ्यांत

तरळणारें पाणी पाहून काकांनीं आवेगानें हंसाला उचलून आपणांजवळ घेतलें.

इतक्यांत दिवाणखान्याचें दार हळूंच किलकिलतें झालें.

---

## : ११ : तडजोड

दार किलकिलें करून पहाणाऱ्या भय्याजीला दिवाणखान्यांत अभूतपूर्व दृश्य पहावयास मिळालें. हिशेबाच्या वह्यांशिवाय शेटजींच्या कड्या-खांद्यावर दुसरें कांहीं पहाण्याची संवय नसलेल्या भय्याजीला शेटजींच्या खांद्यावर हंसा दिसतांच आश्चर्याचा धसकाच बसला. तो किती तरी वेळ तसाच दारांत उभा होता.

हंसा काकांच्या गळ्याला घट्ट मिठी मारून स्फुंदून स्फुंदून रडत होती. तिच्या पाठीवर हलकेच थोपटीत काका तिला म्हणाले,

' हंसा, उगी उगी. रडूं नको बाळ ! '

' नाहीं काका, मला रडूं द्या पोटभर....आई गेल्यापासून मी रडलें नव्हतें हो. मला कोणी नव्हतं....आईऽ ' असें म्हणून हंसा जास्तच स्फुंदूं लागली..

' बरं बरं ! ' असें म्हणून एका हातानें हंसाला कुरवाळीत आणि दुसऱ्या हातानें धोतराचा सोगा वर घेत त्यांनीं तो डोळ्यांवरनं खालीं घेत नाकाला लावला....आणि नंतर एक जो मोठा आवाज झाला त्यानें आतांपर्यंत दारांत स्तब्ध उभा राहिलेला भय्याजी दचकला. त्यामुळें झालेल्या आवाजामुळें शेटजींनीं दाराकडे पाहिलें. आपल्या समाधिसुखाचा भंग झाल्यानें जयरामकाका मनांतून भय्याजीवर चिडले. त्यांनीं रागानेंच भय्याजीला विचारलें,

' क्या है भय्या ? '

' शेटजी .... वो मजूर लोक .... त्यांचा शिष्ट–मंडळ आपकू भेटना चाहते है. ' भय्याजी म्हणाले.

' ह्या संपवाल्यांनीं तर डोकं खाल्लं .... जरा शांतता मिळूं देत नाहींत .... काय त्यांचें म्हणणें

आहे तेंच समजत नाहीं .... जा चालते व्हा म्हणावें त्यांना.'

काका त्रासले आहेत असें पाहून हंसानें आपलें डोकें अलगद त्यांच्या डोक्याला घासलें .... काय वाटलें कुणास ठाऊक, काकांनीं भय्याजीला थांबायला सांगितलें .... ते हंसाला खालीं ठेवून तिला म्हणाले, 'हंसा, बरें वाटतेंय् ना ?"

'हं !' आपले कपाळावरचे केस सांवरीत हंसा म्हणाली.

'माझं एक काम करशील ?' काकांनीं विचारलें.

'हो !'

'बाहेर लोक जमले आहेत— '

'कोणी पाहुणे आहेत ?'

'तसेंच का म्हणेनास ! त्यांना माझ्या वतीनें कांहीं तरी सांगशील का ? दार उघडून बाहेर गेल्यावर लगेच तुला ते व्हरांड्यांत बसलेले दिसतील. त्यांना असें सांग—' असें म्हणून काकांनीं तिच्या कानांत कांहीं तरी सांगितलें आणि पुन्हां विचारलें,

' लक्षांत राहील ना काय सांगायचें तें ? '

' हो तर ! मजाच आहे बाई. पण त्यांना समजेल का हें काका ? ' हंसानें खुषींत येऊन विचारलें.

' हो तर .... नाहीं तर असें पहा हें दे त्यांना—' असें म्हणून काकांनीं एका कागदावर कांहीं तरी लिहिलें आणि तो कागद हंसाजवळ दिला.

जयरामदास शेटजींची वाट पहात मजुरांचें शिष्टमंडळ व्हरांड्यांत बसलें होतें. बापूभय्या, शिवादादा आणि इतर तीन चार कामगार जयरामदास शेटजींच्या दर्शनासाठीं अगदीं उत्सुक झाले होते. त्यांच्या नजरा दारावर अगदीं खिळल्या होत्या. इतक्यांत दार वाजलें .... किलकिलें होऊन उघडलें गेलें. उघड्या दाराकडे पहातांच सगळ्यांची निराशा झाली.

' हात्तेच्या ! हीच पोर अखेर आली होय— ' शिवादादा म्हणाला.

हंसा अगदीं गंभीरपणें पहाण्याचा प्रयत्न करीत त्या शिष्टमंडळाच्या मध्यभागीं येऊन उभी राहिली.

सगळ्यांना एकदां पाहून घेऊन खाकरत हंसा म्हणाली, ‘ प्राहुणे मंडळी, कृपा करून मी सांगतें तें ऐका—’

आतां ही चिमुरडी पोर काय सांगणार आहे हें जाणण्याच्या इच्छेनें सगळे तिच्याकडे पाहूं लागले.

‘ काकांना तुमचें म्हणणें मान्य आहे ! ’ हंसा म्हणाली.

‘ काय ? ’ सगळ्यांनीं एकदम विचारलें.

‘ हो .... गिरणीवर दगड फेंकून तुम्ही जें काकांना विचारलेंत ना तें त्यांना कबूल आहे. ’ हंसा म्हणाली.

‘ आमच्या मागण्या मान्य केल्या ? ’ एकानें एकदम विचारलें.

‘ खरेंच ? ’

‘ मग मी खोटें सांगतें कीं काय ? हें पहा ! ’ असें मोठ्या फणकाऱ्यानें म्हणत हंसानें आपणांजवळचा कागद त्यांच्यापुढें टाकला.

बापभय्यांनीं तो कागद उलगडला. त्याकडे एक

म. ग्रं. सं., ठाणे, [illegible] शाखा.
दा. क्र. ३६९४ नों. दि ... ....
वि.

दृष्टिक्षेप टाकून त्यांनीं मोठ्या आनंदानें त्या कागदावर लिहिलेलें वाचलें.

‘ तुमच्या सर्व मागण्या मान्य आहेत. गिरणीचें काम उद्यां सुरूं होईल. नवीन पगार उद्यांपासूनच लागूं करण्यांत येतील. ’ —जयरामदास

‘ हंसा....’ असें म्हणून शिवादादानें हंसाला जवळ ओढून घेतलें. ‘ हंसा, तूं आमच्या पोटाला आज दिलेंस—आमचें कल्याण केलेंस....’

‘ अय्या ! मी काय केलें....हा कागद काकांनीं दिला. ’ असें म्हणून हंसानें उघड्या दारांतून आपली नजर दिवाणखान्यांत टाकली.

जयरामकाका हंसाचें पुस्तक चाळीत होते.

[ संपूर्ण ]

विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचन

बालवाचकांसाठीं

अत्यंत हृदयंगम अशा छोट्या

# कादंबऱ्या

**( १ ) गुप्त खजिना** २–०–०

एका बेटावर लपविलेला खजिना शोधून काढणाऱ्या एका छोट्या मुलाची जगप्रसिद्ध रोमांचकारी हकीकत.

**( २ ) गोकुळ** १–०–०

आठ दहा मुलांनीं गजबजलेल्या गोकुळासारख्या एका घराची मजेदार कहाणी.

**( ३ ) वाळवंटांतले झरे** १–०–०

भारत–पाकिस्तानच्या राजकीय झगड्यांतहि वाळवंटांतल्या झऱ्याप्रमाणें जीवन देणारी करुणरम्य कथा.

**( ४ ) मोहन** १–४–०

शाळेच्या चिमण्या जगांत मौजेनें वावरणाऱ्या चार मित्रांची कथा.

**आपल्या मुलांच्या हातांत याच कादंबऱ्या द्या.**

## चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करा
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसा
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.